पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

सोमवार, दि. ११ मे २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०१७ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

3 विकास लवांडेंवरील शाईफेकचा राष्ट्रवादीकडून निषेध

४ अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

५ सावेडी नाका बस स्थानकाच्या इमारतीचे भूमिपूजन उत्साहात



पान ८ वर..

# 'लँड टायटलिंग अ‍ॅक्ट' जुलैमध्ये लागू होणार; महाराष्ट्र ठरणार देशातील पहिले राज्य : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : लँड टायटलिंग अ‍ॅक्ट' येत्या जुलै महिन्यात राज्यात लागू होणार असून असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या कायद्यामुळे राज्यातील १४ कोटी जनतेची मालमत्ता ही निश्चित प्रॉपर्टी म्हणून गणली जाणार असून जगातील कुठल्याही देशात ती कॅश करता येईल, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

भारती विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आमदार भीमराव तापकीर, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई, कुलगुरू डॉ. विवेक साळवी यांच्यासह विद्यापीठाचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्री.बावनकुळे म्हणाले, स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी शिक्षण क्षेत्रात उभारलेले कार्य हे महाराष्ट्राच्या अभिमानाचे प्रतीक आहे. गल्लीतली शाळा' ते भारती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प केला आणि तो पूर्ण करून दाखवला. त्यांच्या विचारांचा प्रकाश आज देश-विदेशात पोहोचत आहे.

ते म्हणाले, शिक्षणाशिवाय विकसित भारताची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) धोरण राबवून दीड हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत. तसेच दीड लाख विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए. आय)तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. आगामी काळात विद्यापीठांनी तंत्रज्ञान आणि ए.आय. स्वीकारणे अत्यावश्यक आहे.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रांसाठी कोणत्याही स्टॅम्प पेपरची आवश्यकता राहिलेली नसून विविध प्रमाणपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत राज्यातील ३० लाख विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक कागदपत्रे मोफत पोहोचविण्याची व्यवस्था उभी



करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन हीच छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा असल्याचे सांगत सरकारने समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, असेही ते म्हणाले. नागपूर येथे भारती विद्यापीठाचा विस्तार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी आवश्यक जागा व शासनस्तरीय सहकार्य देण्याची ग्वाही दिली. तसेच टिटबिट पॉलिसी'च्या माध्यमातून अडचणीत असलेल्या भूखंडांचा मार्ग काढण्याबाबतही सकारात्मक भूमिका मांडली.

यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शिक्षणानेच माणसाची प्रगती होऊ शकते हा संदेश देत पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची चळवळ उभी केली. त्याच ध्येयाने स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण क्षेत्रात वटवृक्ष उभा केला. एका छोट्या खोलीत सुरू झालेल्या शाळेचे आज जागतिक पातळीवरील विद्यापीठात रूपांतर झाले असून हे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी शिक्षणासोबत संस्कार, राष्ट्रभक्ती आणि शिस्तही महत्त्वाची असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण, सैनिक प्रशिक्षण, विद्यार्थिनींसाठी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण, शाळांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे यांसारख्या उपक्रमांवर शासन भर देत असल्याचे त्यांनी सांगितले.मराठी शाळांबाबत बोलताना त्यांनी मराठी भाषेबद्दल केवळ भावना व्यक्त न करता प्रत्यक्ष कृतीची गरज असल्याचे नमूद केले. सामान्य व गरीब विद्यार्थ्यांनाही उच्च दर्जाचे शिक्षण देणारे मॉडेल तयार करण्याचे आवाहन त्यांनी भारती विद्यापीठाला केले. भारती विद्यापीठाने गेल्या ६२ वर्षांत लाखो विद्यार्थी घडवून देश-विदेशात शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली असून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे कार्य पुढेही सुरू ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले.यावेळी भारती विद्यापीठाचे कार्यवाह आ. विश्वजीत कदम यांनी प्रास्ताविकात भारती विद्यापीठाचे मागच्या ६२ वर्षातील कारकिर्द, समाजिक योगदान, शैक्षणिक क्षेत्रात केलेले काम विशद केले. यावेळी जेष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांना दुसरा डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याच बरोबर भारती विद्यापीठातील संशोधक, प्राध्यापक, कर्मचारी यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

## संक्षिप्त

### मुंबई मनपा नगरसेवकांना विकासनिधी उपलब्ध

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई: प्रशासकीय राजवटीमुळे रखडलेली प्रभागातील विकास कामे आता मार्गी लागणार आहेत. सुधारणांसह महापालिकेचा खर्चाचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला असून नगरसेवकांना देण्यात येणाऱ्या विकास निधीही उपल्बध करून देण्यात आला आहे. त्यामुळे प्रभागातील कामांना आता गती मिळणार आहे.

महापालिकेने २५ फेब्रुवारी रोजी आर्थिक वर्ष २०२६-२०२७ चे ८० हजार ९९२ कोटींचे आंदाजपत्रक मांडण्यात आले होते. यावर महापालिकेत १२ दिवसांच्या चर्चेनंतर ३० एप्रिल रोजी अर्थसंकल्पातील उत्पन्नाची बाजू मंजूर करण्यात आली. तर ८ मे २०२६ रोजी उपसूचनांसह खर्चाची बाजू मंजूर करीत अर्थसंकल्पास सुधारणांसह महानगरपालिका सभेने मंजुरी दिली आहे. आजवरच्या नियमित प्रक्रियेनुसार अर्थसंकल्प आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी मंजूर होणे अपेक्षित असते. मात्र यावर्षी अर्थसंकल्प मंजुरीस उशीर झाल्याने नगरसेवकांनी सुचविलेल्या स्थानिक विकासकामांना गती देण्याची आवश्यकता होती. त्यानुसार ने महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी निर्देश देत सुधारणांचा अर्थसंकल्प सॅप प्रणालीवर तत्काळ उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील विकास कामांवर आता खर्च करता येणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात महापौर विकास निधीत तब्बल १०० कोटींची वाढ करत २५० कोटी रुपये महापौर विकास निधी म्हणून देण्यात आला आहे. तर सभागृह नेते व स्थायी समिती अध्यक्ष यांच्या अतिरिक्त विकास निधीत १५ कोटींची कपात करण्यात आली आहे. विशेष म्हणजे कॉंक्रिटीकरण, पूल, घनकचरा व्यवस्थापन या विभागातील निधीत कपात करत तो निधी महापौर निधीत वळवण्यात आला आहे.

### जागतिक विद्यापीठांशी 'रयत'चा समन्वय

जनप्रवास । प्रतिनिधी

सातारा : नवनवीन तंत्रज्ञानामुळे जग बदलत आहे. वेगवेगळे विचार आणि संकल्पना जागतिक पातळीवर रुढ होत असताना या सर्व संकल्पनांना समांतर शैक्षणिक व्यवस्था उभी करण्याचे काम रयत शिक्षण संस्थेच्या वतीने केले जात आहे. जगातील नामवंत विद्यापीठांशी समन्वय साधून रयतच्या विद्यार्थ्यांचा सुसंवाद वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. कर्मवीर अण्णांचा त्याग आणि दूरदृष्टी घेऊन संस्थेचा विस्तार अधिक व्यापकपणे सुरू आहे. आज रयत शिक्षण संस्थेची जी उंची वाढली याचे श्रेय रयत शिक्षण संस्थेतील सेवकांना जाते, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी केले.

## नांदेड सिटीतील सुनेच्या खूनप्रकरणी फरार सासरा जळगावातून अटकेत

### आठ दिवस पोलिसांना गुंगारा; मेहरूण परिसरातून अटक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : नांदेड सिटी परिसरात सुनेची हत्या करून आठ दिवसांपासून फरार असलेल्या भानुदास भास्कर चौधरी या आरोपी सासऱ्याला जळगाव स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. आरोपी जळगावमध्ये लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली.

२ मे रोजी घरगुती वादातून भानुदास चौधरी याने आपली सून स्वाती तेजस चौधरी हिच्या डोक्यात वार करून हत्या केली होती. घटनेनंतर त्याने घराला बाहेरून कुलूप लावून पलायन केले होते. याप्रकरणी हवेली पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपी जळगाव शहरातील मेहरूण परिसरात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक



गुन्हे शाखेला मिळाली. त्यानंतर महादेव मंदिर परिसरात सापळा रचून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

प्राथमिक चौकशीनंतर आरोपीला पुढील कारवाईसाठी पुणे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या अटकेमुळे खूनप्रकरणाच्या तपासाला आता वेग येणार आहे.

## मेफेड्रोन निर्मितीचा कारखाना सुरु करण्याच्या तयारीतील त्रिकूट गजाआड

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : मेफेड्रोन (एमडी) निर्मितीचा कारखाना सुरू करण्याच्या तयारीत असलेल्या तिघांना वाघोली पोलिसांनी अटक केली. आरोपींनी कुरकुंभ अमली पदार्थ प्रकरणात जामीनावर असलेल्या एका आरोपीच्या मदत घेतल्याचे तपासात उघडकीस आले आहे. आरोपींकडून ४५ लाख रुपयांचे एमडी, महागड्या मोटारी असा एक कोटी १६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

वाघोली परिसरात मेफेड्रोन विक्री प्रकरणात पोलिसांनी कारवाई करून अनिस शम्मू सय्यद (वय २८, रा. कल्याणी पार्क, मांजरी), हरी उत्तम उफाडे (वय ३५,रा. अजमेरा सोसायटीजवळ, सिद्धार्थनगर, वाघोली), सुमीत अशोक घुले (वय ४१, रा. मांजरी), प्रतीक उर्फ सोन्याबापू



होले (वय ३२, रा. मांजरी), ऋषीकेश अंकुश यनभर (वय २९, रा. कारेगाव, ता. शिरुर, जि. पुणे) यांना १६ एप्रिल रोजी केसनंद परिसरातून अटक केली होती.

पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करण्याचे आदेश दिले होते. आरोपींनी वाघोली, केसनंद, लोणीकंद, तसेच शिरुर तालुक्यात मेफेड्रोन विक्री केल्याची माहिती मिळाली होती. घुले याला आकाश अशोक ढवळे (वय २६, रा. शिरुर) याने मेफेड्रोन विक्रीसाठी दिल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी ढवळे आणि रामनिवास रानूराम बिष्णोई (वय २५, रा. मुंढवा) यांना अटक केली.

कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने छापा टाकून साडेतीन हजार कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले होते. या प्रकरणात विपीनकुमार श्रीरामसागर पंडीत (वय ५४, रा. अंधेरी, मुंबई) याला अटक केली होती. पंडीत याला या प्रकरणात न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. आरोपी ढवळे, बिष्णोई हे पंडीत याच्या संपर्कात आले होते. पंडीत त्यांना मेफेड्रोन तयार करुन देणार होता. तिघे जण मेफेड्रोन तयार करण्याचा कारखाना सुरु करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तिघांना अटक केली.

अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त सोमय मुंडे, सहायक आयुक्त नूतन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर, सहायक निरीक्षक विजय चंदन, प्रदीप मोटे, शेखर शिंदे, विशाल गायकवाड, गहिनीनाथ बोयणे, महादेव कुंभार , राहुल तुपारे यांनी ही कारवाई केली.

## पिंपरीत ८व्या मजल्यावरून पडून ३४ वर्षीय महिलेचा मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी : इमारतीच्या आठव्या मजल्यावरून पडून एका महिलेचा मृत्यू झाला. मावळ तालुक्यातील कातवी येथील व्हीटीपी अर्बन लाइफ सोसायटीत शनिवारी (दि. ९ मे) दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली.

प्रतिभा मनीष शंकर (वय ३४, रा. व्हीटीपी अर्बन लाइफ सोसायटी, कातवी, ता. मावळ जि. पुणे) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. तळेगाव एमआयडीस पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संतोष पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतिभा शंकर या राहत्या घराच्या इमारतीच्या आठव्या मजल्यावरून खाली पडल्याने गंभीर जखमी झाल्या. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. तळेगाव दाभाडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. प्रथमदर्शही हा आत्महत्येचा प्रकार असावा, असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

## उष्माघाताचा वाढता आलेख, राज्यात २२९ रुग्ण, तीन संशयित मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : राज्यात वाढत्या तापमानाचा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, गेल्या दोन महिन्यांत उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. १ मार्च ते ७ मेदरम्यान राज्यभरात उष्माघाताचे एकूण २२९ रुग्ण आढळले असून, त्यांपैकी दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. याशिवाय आणखी तीन संशयित मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. यंदा राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने वारंवार ४० ते ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला आहे. सर्वाधिक ७९ रुग्णांची नोंद छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात झाली असून, त्यानंतर नंदुरबार जिल्ह्यात २९ रुग्ण आढळले आहेत. नाशिकमध्ये १९, अमरावतीत १२, बुलढाण्यात ११, गडचिरोलीत ८, अकोल्यात ७, तर अहिल्यानगर, रत्नागिरी, वर्धा आणि यवतमाळ येथे प्रत्येकी सहा रुग्ण नोंदवले गेले आहेत.

शुक्रवारी (दि. ८) लातूरमधील निलंगा



तालुक्यातील ६० वर्षीय शेतकऱ्याचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याची अधिकृत नोंद करण्यात आली. तसेच जळगाव जिल्ह्यातील ३४ वर्षीय फळविक्रेत्याचाही मृत्यू उष्माघातामुळे झाल्याचे आरोग्य विभागाच्या आरोग्य विभागाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, उन्हाच्या तीव्रतेमुळे बाहेर काम करणारे मजूर, मार्केटिंग अथवा डिलिव्हरी काम करणारे कर्मचारी, वाहतूक पोलिस, रस्त्यावर काम करणारे कर्मचारी तसेच दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

## शेत जमिनी वाटपाच्या वादातून तरुणाची हत्या

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : बारामती तालुक्यातील जोगवडी परिसरात जमिनीच्या वाटपाच्या वादातून सूरज संजय गुरुमकर या तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलिसांनी मृत सूरजचे वडील, सावत्र आई आणि सावत्र भावाविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला असून, या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परवा रात्री सूरजचा मृतदेह त्याच्या घराशेजारील परिसरात संशयास्पद अवस्थेत आढळून आला. त्याच्या डोक्यावर गंभीर जखमा आढळल्याने वार करून हत्या करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनेची माहिती मिळताच वडगाव निंबाळकर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

गुरुमकर कुटुंबात गेल्या काही दिवसांपासून जमिनीच्या वाटपावरून सतत वाद सुरू होते. याच वादातून सूरजची हत्या झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी मृत तरुणाचे वडील संजय गुरुमकर, सावत्र आई माया गुरुमकर आणि सावत्र भाऊ अर्थव गुरुमकर यांच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्यात तब्बल ४८७ अनधिकृत शाळा; ७६ शाळांवर बंदी: १११ शाळांवर गुन्हा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : राज्यात तब्बल ४८७ शाळा अनधिकृत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंबई विभागात सर्वाधिक संख्या असल्याचे समोर आले आहे. या शाळांपैकी केवळ ७६ शाळांवर बंदीची कारवाई केली आहे,तर १११ शाळाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलाचे ॲडमिशन घेण्यापूर्वी ज्या शाळा अनधिकृत आहेत, त्या तपासाव्यात. अनधिकृत शाळेत आपल्या पाल्यांचे ॲडमिशन घेऊ नये यासाठी आवाहन केले जात आहे.

राज्यातील तब्बल ३१५ शाळांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. प्रत्यक्षात केवळ १६ प्रकरणात दंड वसूल झाला असल्याची माहिती शिक्षण आयुक्तांनी दिली आहे. पुणे विभागात ६३ अनधिकृत शाळा आढळलेल्या असून त्यापैकी ११ शाळा बंद केल्या आहेत ७ शाळांविरोधात गुन्हा दाखल केला आहे १० शाळांकडून दंड वसुली केली आहे. राज्यात जवळपास ४७८ शाळा अनाधिकृत असल्याची माहिती समोर आली आहे. पण पालकांनी पाल्याचे ॲडमिशन घेण्याआधी शाळेंबाबत काही गोष्टी समजून घेणं गरजेचे आहे.

पालकांनी खालील गोष्टींची एकदा तपासाव्यातच...

शाळेकडे महाराष्ट्र शासनाचे



मान्यता प्रमाणपत्र आणि 'ना-हरकत प्रमाणपत्र' असल्याची खात्री करा, जर शाळा CBSE किंवा ICSE बोर्डाची असल्याचे सांगत असेल, तर संबंधित बोर्डाच्या अधिकृत वेबसाइ'टवर जाऊन शाळेचा 'Affiliation Number' तपासा, दरवर्षी शिक्षण विभाग किंवा जिल्हा परिषदेकडून अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली जाते. प्रवेश घेण्यापूर्वी ही यादी नक्की तपासा, शाळेला स्वत:चे खेळण्याचे मैदान, अग्निशमन यंत्रणा आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा आहेत का, याची पाहणी करा, शाळेचे कार्यालय आणि वर्ग एकाच सुरक्षित संकुलात असावेत. व्यावसायिक इमारतीमध्ये किंवा दाटीवाटीच्या ठिकाणी चालवल्या जाणाऱ्या शाळांबाबत सावध राहा, शाळेकडे शासनाचे अधिकृत मान्यता प्रमाणपत्र आहे का?, याची खातरजमा करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

बोगस शाळा ओळखा (प्रमुख लक्षणे)

शाळेचा ११ अंकी U-DISE क्रमांक नसल्यास किंवा तो चुकीचा असल्यास शाळा बोगस असू शकते ,

मान्यता: शासनाची मान्यता किंवा बोर्डाच प्रमाणपत्र नसणे.

नाव: नाव खूप उच्चभ्रू किंवा इंग्रजी असले तरीही, आवश्यक कागदपत्रे नसल्यास ती बोगस शाळा असू शकते.

दरम्यान, पुणे जिल्हा परिषदेने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी एकूण ४५ शाळांना अनधिकृत घोषित केले आहे. यामध्ये ग्रामीण भागात २४ शाळा, पुणे महापालिका भागात १२ शाळा आणि पिंपरी चिंचवडमधील १२ शाळांचा समावेश आहे.

# अग्रलेख : पुन्हा भाजपमध्ये एनकमिंगची 'भरती'

पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांची तब्बल १५ वर्षांची राजवट भाजपने संपुष्टात आणली. तमिळनाडूत लोकप्रिय अभिनेता विजय यांच्या टीव्हीके पक्षाला अभूतपूर्व यश मिळाल्याने या राज्यातील द्रमुक व अण्णा द्रमुक या दोन्ही पक्षांची वाताहत झाली. ममता बॅनर्जी व एम. के. स्टॅलिन यांचा केंद्रातील सत्ताधारी भाजपशी गेल्या काही वर्षांपासून संघर्ष सुरू होता. केंद्रीय तपास यंत्रणांपासून राज्यपाल व निवडणूक आयोगापर्यंत सर्व यंत्रणा, भाजपच्या संघटनेपासून सोशल मीडियावरील ट्रोलर्स असे सगळेच या दोन राज्यातील प्रादेशिक पक्षांची सत्ता उखडून फेकण्याकरिता दीर्घकाळापासून प्रयत्न करीत होते. अखेर त्यांना यश आले. त्यामुळे या दोन राज्यातील निवडणूक निकालांचे परिणाम तीन वर्षांनंतर होणाऱ्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांवर होणार हे स्पष्ट दिसत आहे.

भाजपमध्ये गेल्यापासून शांत झोप लागते, अशी कबुली काही वर्षांपूर्वी हर्षवर्धन पाटील यांनी दिली होती, तर माजी खासदार संजयकाका पाटील यांनी भाजपमध्ये असताना कोणत्याही चौकशीचा त्रास होत नाही, असे स्पष्ट केले होते, एकूणच भाजप हीच शांत झोपेची दवादारू असल्याची भावना प्रबळ होणार आहे. महाराष्ट्रात अलीकडेच झालेल्या महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले. मात्र या निवडणुकीत महाराष्ट्रातील विरोधी पक्ष म्हणून ओळखले जाणारे काँग्रेस, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे कुठेही स्पर्धेत व पर्यायाने चर्चेत नव्हते. केवळ मुंबई महापालिकेतील उद्धव ठाकरे यांची दीर्घकाळाची सत्ता संपुष्टात आणण्याकरिता भाजपने सर्व शक्ती पणाला लावली होती. मात्र राज्यात अन्यत्र सत्ताधारी महायुतीमधील एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांची भाजपसोबत स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करण्याकरिता स्पर्धा सुरू होती. निवडणूक प्रचार काळात या पक्षांनी परस्परांवर अत्यंत गंभीर आरोप केले.

ज्या सिंचन घोटाळ्यावरून अजित पवार यांना भाजपने लक्ष्य केले त्या सिंचनाशी संबंधित घोटाळ्यांच्या युती सरकारच्या काळातील फाइल उघड करण्याचा इशारा अजित पवार यांनी प्रचारात दिला होता. नवी मुंबई व ठाण्यात भाजपचे मंत्री गणेश नाईक यांनी एकनाथ शिंदे यांचा पाणउतारा करण्याची एकही संधी सोडली नव्हती. राज्यातील महायुती सरकारवर त्यामधील घटकपक्षच विस्तव ठेवतायत की काय, असे वाटावे अशी परिस्थिती होती. या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली होती. मात्र अचानक अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. त्या दुर्घटनेवरून बरेच आरोप-प्रत्यारोप सुरू असून काहींना तर तो घातपात वाटतो.

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या दिशेने जर पवार काका-पुतण्यांनी पावले टाकली असती तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व मुख्यत्वे मुंबईत मार खाऊनही महापालिका निवडणुकीपूर्वी एकत्र आलेल्या उद्धव सेना व मनसे यांच्या युतीलाही बळ मिळाले असते. महाराष्ट्रात काँग्रेसची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत, याची प्रचिती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसचे क्षीण का होईना पण अस्तित्व टिकून असल्यामुळे आलेली आहे. त्यामुळे या साऱ्यांचा एकत्रित विचार केला तर विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशानंतर महाराष्ट्रात विस्कटलेली महाविकास आघाडी पुन्हा २०२९ पर्यंत आकाराला आणण्याच्या दिशेने पवार काका-पुतण्याने पावले टाकली होती. मात्र त्या विमान अपघाताने सर्व मुसळ केरात गेले किंवा घातले गेले. प्रादेशिक पक्षांचे भ्रष्ट नेते बदनाम करतानाच 'सेक्युलॅरिझम' या शब्दाबद्दल तिटकारा निर्माण होईल, अशा पद्धतीने हा शब्द मुस्लिम लांगूलचालनाशी जोडण्याची खेळी खुबीने केली. त्यानंतर देशातील हिंदूंनी आता अल्पसंख्यांकांविरुद्ध एकवटण्याची गरज आहे हे पर्सेप्शन तयार केले. लव्ह जिहाद, धर्मांतर, दहशतवाद याच्याशी संबंधित प्रकरणे गेल्या काही वर्षांत राजकीयदृष्ट्या तापली. नाशिकमधील टीसीएसमधील प्रकरणही गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आणले गेले.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार असताना जीएसटीचे २२ हजार कोटी रुपये थकल्याचे तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार हेच सातत्याने सांगत होते. या साऱ्याचा परिणाम असा झालाय की, तरुणांना विकासकामे होण्याकरिता भाजपची सत्ता हवी, महिलांना खात्यात पैसे जमा होतात म्हणून भाजप हवी, तर बहुसंख्यांकवादाच्या प्रेमात असलेल्यांना बहुसंख्यांक एकवटण्याची प्रक्रिया गतिमान करण्याकरिता भाजपची सत्ता हवी, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यापूर्वी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांना भोगावा लागलेला तुरुंगवास महाराष्ट्रातील नेत्यांनी पाहिला आहे. सध्या सत्ताधारी वळचणीला असलेले छगन भुजबळ तुरुंगात होतेच. त्यामुळे केंद्रीय यंत्रणांचा जाच, तुरुंगवासाची भीती, निधीबाबतची सापत्न वागणूक, जनमानसात भाजपच्या हिंदुत्वाचे वाढलेले सुप्त आकर्षण अशा विविध मुद्द्यांमुळे सध्या विरोधी बाजूला असलेले नेते भाजपबाबत मवाळ भूमिका घेणार, असे स्पष्ट दिसत आहे. भाजपही उद्धव ठाकरे यांच्याप्रमाणेच एकनाथ शिंदे यांना आपल्या राजकीय स्वार्थाकरिता वापरून घेणार. तीच परिस्थिती राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्हीकडील नेत्यांची आहे. एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्याकरिता अशा आणाभाका घेणाऱ्या ठाकरे बंधूंमध्ये भाजपची मनमर्जी कोण अधिक जिंकतो, याची स्पर्धा लागलेली दिसेल. भाजपने कितीही चेपण्याचा प्रयत्न केला तरी रुसून गावी निघून जाण्याची संधी मित्रपक्षांच्या नेत्यांना असणार नाही. जो पक्ष नखे बाहेर काढेल तो खिळखिळा केला जाईल. विरोधी व सत्ताधारी पक्षातील ज्या आमदार, खासदार यांना पुन्हा निवडून येण्याची शाश्वती वाटणार नाही किंवा आपल्या मतदारसंघातील वातावरण बदलले आहे, याची जाणीव होईल ते थेट भाजपमध्ये प्रवेश करण्याकरिता रांग लावतील.

## अंतरंग

### पश्चिम बंगालमध्ये नवी पहाट

ममता बॅनर्जींचा पाठोपाठ दोन्ही विधानसभा निवडणुकीत सलग दोन वेळा पराभव करून देशात जायंट किलर ठरलेले सुवेंधू अधिकारी यांनी पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री म्हणून रविवारी शपथ घेतली आणि राज्यात नव्या पर्वाला सुरूवात झाली. ममता बॅनर्जींच्या पंधरा वर्षाच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत सतत हिंसाचार, दहशत, हत्या, खुनाच्या धमक्या, खंडणी अशा घटनांनी जनता भयभीत होती. ममता यांना सत्तेवरून हटविल्याशिवाय राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण होणार नाही, याची खात्री पटल्यामुळेच भाजपाने सत्ता परिवर्तनाची हाळी दिली होती. सलग तीन निवडणुकांमधे विक्रमी बहुमत मिळविणाऱ्या तृणमूल काँग्रेसचा पराभव करणे हे भाजपापुढे मोठे आव्हान होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची कुशल रणनिती यापुढे तृणमूल काँग्रेसचा निभाव लागला नाही. भाजपाने २०७ जागा जिंकल्या तर तृणमूलला ८० जागा मिळवताना दमछाक झाली. दि. ४ मे रोजी मतमोजणी झाल्यानंतर ममता यांना टाटा- बाय बाय असे अमित शहांनी केलेल भाकीत खरे ठरले. राज्यातील जनतेची भावना व इच्छा यांनी ओळखली होती. ज्या राज्यात दहा वर्षापूर्वी भाजपाचे जेमतेम तीन आमदार निवडून आले होते. त्या राज्यात या पक्षाचे दोनशे पेक्षा जास्त आमदार निवडून आले कारण बंगालमधील मतदारांना तृणमूल काँग्रेसच्या विळख्यातून सुटका करून घ्यायची होती. मतदारांनी भाजपाला पर्याय म्हणून निवडले आहे. मोदी - शहा यांच्या नेतृत्वावर विश्वास प्रकट केला आहे. भाजपाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून सुवेंधु अधिकारी यांनी शपथ घेतली आणि पश्चिम बंगालमधे नवी पहाट उगवली आहे. राज्यात भाजपाचे सरकार आले म्हणून ऑटो रिक्षावाल्यापासून ते व्यापारी, विद्यार्थी, युवक , महिला या सर्वांना आनंद झाला आहे. तृणमूल काँग्रेसच्या दहशतवादापासून सुटका होणार म्हणून नव्या सरकारकडून अपेक्षा उंचावल्या आहेत. सुवेंधू अधिकारी यांच्या ब्रिगेड परेड ग्राउंडवरील शपथविधी समारंभाला पंतप्रधान मोदी व केंद्रीय गृहमंत्री शहा स्वत: उपस्थित होते. शपथविधीच्या आदल्या दिवशी झालेल्या भाजपाच्या नवनिर्वाचित विधिमंडळ पक्षापुढे शहा यांनी केंद्रीय निरीक्षक म्हणून सुवेंधू अधिकारी यांचे नाव नेतेपदासाठी जाहीर केले तेव्हा सर्व राज्यात आनंदाची लाट दिसून आली. सुवेंधू अधिकारी हे राज्याचे मुख्यमंत्री म्हणून योग्य निवड आहे व तेच तृणमूलच्या दहशतवादाला चाप लावू शकतील असा जनतेला विश्वास आहे. बंगाली भाषेत शपथ घेतल्यानंतर सुवेंधू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जवळ जाऊन त्यांना वंदन केले. महिलांची सुरक्षितता, वाढलेली प्रचंड बेरोजगारी, तरूणांमधील असंतोष, भांडवल गुंतवणूक होत नसल्याने नव्या उद्योग व्यवसायांची कमतरता, अल्पसंख्यांकांचे लांगुलचालन आणि सर्वात महत्वाचे बांगला देशातून रोज येणाऱ्या घुसखोरांना राज्यात दिले जाणारे संरक्षण या समस्यांशी भाजपाला सरकारला डोळ्यात तेल घालून लढावे लागणार आहे. ज्या प्रमाणे आसाममधे घुखखोरी रोखण्यात तेथील भाजपा सरकारने यश मिळवले आहे तसेच बंगालमधे कठोर उपाय योजून घुसखोरांचा प्रवेशच रोखला पाहिजे. ५६वर्षाच्या सुवेंधू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांना २०२१ मधे विधानसभा निवडणुकीत नंदिग्राम मतदारसंघात पराभूत केले होते आणि आता २०२६ मधे भवानीपूर मतदारसंघात पराभूत केले. मुख्यमंत्र्यांचा दोन निवडणुकीत दोन वेळा पराभव करण्याचा विक्रम सुवेंधू अधिकारी यांनी करून दाखवला आहे. सुवेंधू अधिकारी हे अगोदर विद्यार्थी दशेपासून काँग्रेसमधे होते. सुवेंधू यांचे एमए पर्यंत शिक्षण झाले आहे. त्यांचे वडील काँग्रेसचे खासदार होते व डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारमधे मंत्री होते. सुवेंधू हे ममता यांना तृणमूल काँग्रेसच्या सुरुवातीपासून साथ देत होते. तृणमूल काँग्रेसच्या आंदोलनात ते आघाडीवर असायचे. बंगालमधील सलग ३४ वर्षे सत्तेवर राहिलेले डाव्या आघाडीचे सरकार ममता यांनी उलथवले त्यात सुवेंधू यांचा सिंहाचा वाटा होता. ममता यांचा भाचा अभिषेक बॅनर्जी यांचे महत्व पक्षात वाढत गेले. तिथूनच सुवेंधू अधिकारी नाराज झाले. ममता यांचे नेतृत्व लोकप्रियतेच्या शिखरावर असताना त्यांना आव्हान देणे सोपे नव्हते पण ते धाडस त्यांनी डिसेंबर २०२० मधे दाखवले. तृणमूल काँग्रेसचा राजीनामा देऊन भाजपामधे सामील झाले. अमित शहा यांनी सुवेंधू यांना विश्वास दिलाच पण पश्चिम बंगालमधील २०२१ च्या निवडणुकीची धुरा त्यांच्यावर सोपवली. त्या निवडणुकीत भाजपाचे ७७ आमदार निवडून आले. या आश्चर्यकारक यशाने भाजपाचा आत्मविश्वास वाढला. आपण ममता यांचा पराभव करू शकतो, २०२६ च्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला सत्तेवरून हटवूशकतो अशी रणनिती भाजपाने आखली. बंगालमधील जनसमर्थन भाजपाबरोबर होते. जनतेला परिवर्तन हवे होते. तेच घडले व निवडणुकीत सर्वत्र कमळ फुलले. सुवेंधु अधिकारी हे एकेकाळी ममता बॅनर्जींचे सेनापती म्हणून ओळखले जात असत, आता तेच सुवेंधु हे ममता यांचे राजकीय शत्रू नंबर १ बनले आहेत. ज्या नंदिग्रामधे वीस वर्षापूर्वी ममता यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलन करून बुध्ददेव भट्टाचार्य यांच्या सरकारला हादरे दिले होते, त्याच नंदिग्राममधे सुवेंधू यांनी २०२१ मधे ममता यांचा पराभव करून दाखवला. ज्या भवानीपूर मतदारसंघातून ममता यांनी सतत विजय मिळवला त्याच मतदारसंघात सुवेंधू यांनी ममता यांचा यंदा पंधरा हजार मतांनी पराभव केला. एकेकाळी सुवेंधू अधिकारी हे तृणमूल काँग्रेसचा लढाऊ चेहरा होता तेच सुवेंधू हे भाजपाचे राज्यातील यशस्वी सारथी ठरले आहेत. मोदी - शहांचा विश्वास त्यानी संपादन केला आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

## राजकारण

# मोदी आणि शिंदेंच्या भेटीची चर्चा

### राज्यात तर्क-वितर्क सुरू

पश्चिम बंगालमध्ये शनिवारी शपथविधी सोहळा पार पडला असून भाजपाचे सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. भाजपासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा होता, कारण, भाजपाने पहिल्यांदाच पश्चिम बंगालमध्ये सत्ता स्थापन केली आहे. मात्र या सोहळ्यातील पंतप्रधान मोदी व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीतील दृष्याने महाराष्ट्रात चर्चेला उधाण आले आहे. या दोघांमध्ये नेमकी काय चर्चा झाली हे मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे.

सत्ताधारी ममता बॅनर्जींच्या टीएमकेला पराभवाची धूळ चारली आहे. दरम्यान, आज पश्चिम बंगालमध्ये शपथविधी झाला असला तरीही तेथील एका दृष्याने महाराष्ट्रात चर्चेला उधाण आले आहे. कारण, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये हे दोन्ही नेते एकमेकांशी संवाद साधताना दिसत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये शपथविधी सोहळ्याकरता देशभरातली अनेक नेते उपस्थित होते. विविध राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हजर होते. तसंच, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवारही



उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व राज्यातील नेत्यांना हस्तांदोलन करत भेट घेत होते.

चंद्राबाबू नायडू, जे. पी. नड्डा, योगी आदित्यनाथ, देवेंद्र फडणवीस यांच्याशी हस्तांदोलन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत येऊन थांबले. तिथे त्यांनी एकनाथ शिंदे यांच्याशी बराच वेळ चर्चा केली. त्यांच्याबाजूला चिराग पासवानही उपस्थित होते.

दरम्यान, हा व्हिडिओ आता सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होतोय. या दोघांमध्ये नेमकी काय चर्चा झाली हे अद्याप गुलदस्त्यात आहे. एकनाथ शिंदे यांचं विमान काही दिवसांपूर्वी भरकटलं होतं. याबाबत मोदी यांनी त्यांच्याशी चर्चा केल्याचं वृत्त आहे. मात्र, याबाबत कोणताही अधिकृत दुजोरा नाही.

#### चर्चा मुंबईत हेलीकॉप्टर भरकटल्याची?

पश्चिम बंगालमध्ये शपथविधी सोहळ्याकरता देशभरातली अनेक नेते उपस्थित होते. विविध राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हजर होते. तसंच, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवारही उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व राज्यातील नेत्यांना हस्तांदोलन करत भेट घेत होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत येऊन थांबले. तिथे त्यांनी एकनाथ शिंदे यांच्याशी बराच वेळ चर्चा केली. त्यांच्याबाजूला चिराग पासवानही उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत येऊन थांबले. तिथे त्यांनी एकनाथ शिंदे यांच्याशी बराच वेळ चर्चा केली. त्यांच्याबाजूला चिराग पासवानही उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांचं विमान काही दिवसांपूर्वी भरकटलं होतं. याबाबत मोदी यांनी त्यांच्याशी चर्चा केल्याचं वृत्त आहे. मात्र, याबाबत कोणताही अधिकृत दुजोरा नाही.

**भाजपा नेत्यांमध्ये आनंद**

शनिवारी कोलकाताच्या प्रतिष्ठित अशा ब्रिगेड परेड मैदानावर सुवेंदू अधिकारी आणि मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. राज्यपाल आरएन रवी यांनी सुवेंदू अधिकारी यांना पश्चिम बंगालचे नववे मुख्यमंत्री म्हणून शपथ दिली. सुवेंदू अधिकारी यांच्यासह भाजपाचे नेते यावेळी भावनिक आणि त्याचवेळी आनंदितही असल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी मंचावरील भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांची भेट घेतली. मंचावर उपस्थित ९८ वर्षीय माखनलाल सरकार यांना भेटल्यानंतर पंतप्रधान मोदींनी त्यांना आलिंगन देत, त्यांच्या पायांना स्पर्श करत आशीर्वाद घेतले. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे सहकारी असलेले सरकार हे भाजपाच्या सुरुवातीच्या काळातील पश्चिम बंगालमधील महत्त्वाच्या नेत्यांपैकी एक आहेत.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ वैशाख शके संवत्- १९४८
संवत्सर -पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- वैशाख
ऋतु- सौर ग्रीष्म कृष्ण पक्ष तिथि : नवमी १५:२४:४९
नक्षत्र : शतभिषा २५ : २८ : २६+ योग : ऐन्द्र २५ : ०३ : ५३+ करण : गर १५ : २४ : ४९ करण : वणिज २७ : १५ : ०८+ सूर्य : मेष
चन्द्र : कुम्भ हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - जिल्काद तारीख - २४
विशेष विठ्ठलानंद सरस्वती पुण्यतिथी - अमरावती झिपरूअण्णा पुण्यतिथी - नासिराबाद (जळगाव) शिवानंद केसरी महाराज पुण्यतिथी - छ संभाजीनगर

## राशी भविष्य...

**मेष** – आपल्या बुद्धिच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

**वृषभ** – प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

**मिथून** – प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धिने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**कर्क** – कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल.

**सिंह** – व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कन्या** – व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**तूळ** – सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी रहाल. चैन करण्याकडे ओढा राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील. वहान चालवतांना काळजी घ्या. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**वृश्चिक** – आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**धनू** – नवीन व्यवसायास सुरुवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दाम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** – जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कुंभ** – न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृद्ध व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल.

**मीन** – प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

## पारावरचा फड

बारावीपाठोपाठ दहावीचेही निकाल नुकतेच जाहीर झाले. यामध्ये राज्यातील अनेक विद्यार्थ्यांना शंभरपैकी शंभर टक्के गुण मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. अर्थात मुलांना शारीरिक शिक्षणाच्या नावावर ५ टक्के गुण हे वाढीव असतातच. त्यामुळे पैकीच्या पैकी गुण गृहीत धरले तरी वास्तविक शास्त्र, गणित आदी विषयांमध्ये पैकीच्या पैकी गुण शक्य आहेत. परंतु मराठी हिंदीसारख्या भाषा विषयात पैकी गुण कसे शक्य आहे. शिवाय या मार्गातून गुणवत्तेचे मोजमाप झाले तरी प्रत्यक्षात त्या गुणांचा व्यावहारीक किंवा पुढच्या शिक्षणात कितपत उपयोग होतो हा भाग निराळा. त्यातच पुढच्या टप्प्यात व्यावसायिक शिक्षणात त्याचा काहीच उपयोग होत नाही. शिवाय दहावी-बारावीच्या संख्येनुसार फुगणाऱ्या आकड्याचा भविष्यात पुढच्या शिक्षणात मोठ्या अपेक्षांचे ओझे पालक गृहीत धरून ते विद्यार्थ्यांवर लादतात. पुढे जावून ते एकतर अडकतात, अर्धवट शिक्षण सोडून करिअरचे वाटोळे करून घेतात. याबाबत पारावरची चर्चा !

**पांडूनाना :** धाहावी, बारावीच्या परीक्शेत मारकांची बरसात झाल्याचं दिसून येतंया. पैकीच्या पैकी मारक पटकावत्यात पोरं.

**बाबूराव :** का न्हाई पटकावनार? आता त्येंचं शेड्यूल शाळा, कलास आन् त्यात परायवेट कोचींग, मारकाची शर्यत हुतीया. पोरास्नी जे परश्न परीक्शेत पडत्यात तेच शिकवत्यात. मग हुनारच की पास.

**पांडूनाना :** त्यात पोरींचा टक्का वाडता हाय हे नेहेमीचच. पोरं इतर नादात आन् पोरी आभ्यासात...!

**बाबूराव :** ते समदं ठीकाय, पर त्या परीक्शेला काय आरथ हाय? म्होरच्या शिक्शनाला त्येचा उपेग न्हाय होत. त्येला शीईटी, निटसारक्या परीक्शांचं मेरीटच उपेगाया ठरतं.

**पांडूनाना :** आक्शी बराबर हाय.

**बाबूराव :** एकीकडं आसा निकाल, आन् दुसरीकडं सातवी-आटवीच्या पोरदस्नी नीट वाचता लिहीता येत न्हाय आशी आवस्ता. मग त्या शिक्शनाचा उपेग काय?

**पांडूनाना :** पासपुरतं शिक्शन आन् डिगरी कामाची न्हाय. त्येनास्नी व्येवहाराचं आन् व्येवसायाभिमुक शिक्शान लाहानपनापासनंच द्याय हावं.

**बाबूराव :** व्हय, न्हायतर डिगरी, डबल डिगरीवालं शिपाई आन् कारकुनी काम करत्यात. त्यापरास स्किल शिक्शान मिळालं तर ते उद्योग-रोजगार करत्याल.

**पांडूनाना :** सरकारनंच आता त्याकरता शिक्शन येवस्थेत बदल कराय हावंत. नुसता शिक्शनाचा बाजार आन् नावापुरतं मास्तर नगंत.

**बाबूराव :** व्हय, न्हायतर शिकून बी बेकारी वाडलीच तर त्ये काय कामाचं.

**पांडूनाना :** त्याकरता सरकारनं नवं धोरन ठरवून शिक्न पद्धतीचा पॅटरन ठरवावा. **- अमृत चौगुले**

## उपदेश कथा

### भलत्या ठिकाणी भाषण

हिमालयातले दोन हंस व कासव यांची एकदा मैत्री झाली. हंसांकडून हिमालयाचं वर्णन ऐकून कासव म्हणालं, बाबांनो मला घेऊन चला की रे तुमच्या बरोबर हिमालयात हंस म्हणाले, तुला चोचीनं पकडता येणार नाही. म्हणून एका काठीला तू मध्ये दातांनी धर. आम्ही दोघे काठी पकडू. मात्र तोंड उघडशील तर काठी सुटेल आणि तू प्राण गमावशील हे ध्यानात ठेव. कासवाने काठीचा मध्यभाग दातांनी पकडला व ती काठी घेऊन हंस उडत चालले. कासवालादेखील हे सुंदर हंस आपल्याला नेतात याचा अभिमान वाटला. एका शहरावरून हे तिघे चालले असता खेळणाऱ्या मुलांनी ते दृश्य पाहिलं. मुलं ओरडून म्हणाले, अरे पहा ते देखणे हंस आणि मध्ये लटकतयं कुरूप ओबडधोबड कासव. कासवाला संताप आला त्या मुलांना उद्देशून बोलण्यासाठी कासवानं तोंड उघडलं मात्र ते खाली कोसळून गतप्राण झालं.

## दिनविशेष...

**आंतरराष्ट्रीय**

१८७८ - १८६ टन वजनाचा ३५०० वर्षे जना ओबेलिस्क (वरती निमुळता होत गेलेला दगडी स्तंभ) अलेक्झांड्रियातून इंग्लंडला नेण्यात आला. तो लंडनला उभारण्यात आला. याला 'क्लिओपात्राज् निडल' म्हणतात. मात्र, त्याचा क्लिओपात्राशी कसलाही संबंध नाही.

१९४० - फ्रान्समध्ये लास्को या गुहांचा योगायोगाने शोध. या गुहांत आदिमानवाने चितारलेली रंगीत चित्रे असून, त्या गुहा आता जागतिक ठेवा मानल्या जातात.

१९४० - ब्रिटिश विमाने बटाटा पिकावर विमानातून किडे टाकतात, असा दावा जर्मनीने केला.

१९४१ - रशियन आघाडीवर हिवाळ्याची सुरुवात. हा हिवाळा फारच भीषण होता. तो 'जनरल विंटर' या नावाने प्रसिध्द आहे. या हिवाळ्यात थंडीने काकडून जेवढे जर्मन सैनिक मेले, तेवढे रशियांनानीही मारले नाहीत.

१९४२ - इटालियन युद्धकैद्यांना घेऊन निघालेले 'लॅकोनिया' हे जहाज जर्मनांनी बुडवले. त्यातील ८०० युद्धकैदी बुडून मेले. १००० युद्धकैदी वाचले.

१९४३ - ओट्टो स्कोर्झेनी या जर्मन कमांडोने अतिशय धाडसाने कैदेतल्या मुसोलिनीस पळवून नेले.

१९४४ - अमेरिकी सैन्य आखेनजवळ जर्मनीत शिरले.

१९४५ - ॲडमिरल माउंटबॅटनने जपानी सैन्याची शरणागती स्वीकारली.

### शेतकऱ्यांना भावाची हमी कधी?

राज्यात एकीकडे अवकाळी पावसाने थैमान



घातले असताना दुसरीकडे पिकांना भाव मिळत नाही म्हणून शेतकऱ्यांना एकतर ती मातीमोल किमतीने किंवा ती जाळून नष्ट करावी लागत आहेत. वास्तविक शेती प्रधान देशात शेतकरीच इतका गांजला जाणे हे लोकशाहीस पोषक नाही. अवकाळीने कोकणसह राज्यातील सर्वच जिल्ह्यात थैमान घालून नुकसान केले. तर दुसरीकडे कांद्याला दर मिळत नसल्याने धाराशीवमध्ये संतप्त शेतकऱ्याने दोन एकर शेतातील कांदा पीक जाळून टाकले. हिच परिस्थिती मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातदेखील दिसून आली. तेथे अत्यंत कष्टातून पिकविलेला कांदा अगदी मातीमोल अर्थात दीड रुपये किलोने शेतकऱ्याला विकावा लागला या सौद्यात त्याने या पिकासाठी गुंतवलेले भांडवल देखील निघाले नाही. एकीकडे आपण तंत्रज्ञानाचा गवगवा करत असताना शेतकरी आत्महत्या काही केल्याने थांबताना दिसत नाहीत. तर दुसरीकडे शासन व्यवस्थादेखील अशा बाबतीत म्हणावी तितकी गंभीर असल्याचेही दिसून येत नाही. हमीभावाची शेतकऱ्यांची मागणी जुनीच आहे. आता तरी सरकारने याबाबत योग्य विचार करून पिकाच्या भावाची हमी घ्यावी इतकेच.

## जन की बात...

### पाच राज्यातील निकाल म्हणजे जनमताचा यथार्थ कौल

नुकत्याच देशातील पाच राज्यातील निवडणुकांचे निकाल लागले. यामध्ये आसाम व पाँडिचेरीमध्ये जनतेने प्रस्थापितांना निवडून दिले आहे . तर केरळ व तामिळनाडू व पश्चिम बंगालमध्ये बदल झाला आहे. केरळमध्ये काँग्रेस प्रणित आघाडी डाव्या आघाडीचा पराभव करून सत्तेत आली आहे. तामिळनाडूमध्ये सत्ताधारी द्रमुकचा पराभव झाला असून मुख्यमंत्री स्टॅलिन हे पराभूत झाले आहेत. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस पराभूत झाली असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव झाला आहे. हे निकाल म्हणजे लोकांनाच असलेला कौल असेच म्हणावे लागेल तथापि पाचही राज्यांची परिस्थिती वेगळी आहे

**पश्चिम बंगाल** : या राज्यात गेली सुमारे १५ वर्षे ममता बॅनर्जी सत्तेवर होत्या. डाव्या पक्षांचा अभेद्य गड भेदून त्यांनी सत्ता मिळविली होती त्यांची व तृणमूल काँग्रेसची बंगालमध्ये एक प्रकारची दशहत होती. मात्र भाजपने यावेळी सर्व गोष्टींचा अभ्यास करून रणनीती ठरविली होती. अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली नियोजन केले होते. त्यामुळे भाजपचे २०७ उमेदवार निवडून आले. सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा भवानीपूर मतदारसंघात पराभव केला .

**आसाम** : आसाम मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी तिसऱ्यांदा सत्तेवर आली आहे भाजपने तेथे आसाम गण परिषद , युनायटेड पीपल्स पार्टी, लिबरल आणि बोडोलँड पीपल्स पार्टी याबरोबर युती केली होती. तेथे भाजप प्रणित आघाडीने १२६ पैकी १०३ जगावर बहुमत मिळविले बांगला देशी घुसखोर, आसामची अस्मिता, महिला सुरक्षा रोजगार या मुद्द्यावर निवडणूक लढविली होती. तेथे हिमंत बिश्व शर्मा यांची कामगिरी चांगली होती.

**केरळ** : केरळ मध्ये काँग्रेस प्रणित युडीएफ आघाडीने १४० जागांपैकी तब्बल १०२ जगावर विजय मिळविला आहे. केरळ मध्ये गेल्या दहा वर्षानंतर प्रथमच सत्तांतर झाले आहे गेल्या पाच वर्षातील डाव्यांच्या कारभारावर जनता नाराज होती.

**तामिळनाडू** : तामिळनाडूमध्ये एकूण २३४ जागांपैकी टीव्हीके पक्षाला १०७, तर द्रमुक व अद्रमुक यांना प्रत्येकी ६० व ४७ जागा आहेत. काँग्रेस पक्षाला पाच जागा आहेत इतर पक्षाला १५ जागा आहेत कोणाचीही आघाडी न करता टीव्हीकेनी हे यश मिळविले आहे.

**पाँडिचेरी** : येथे सत्ताधारी एनडीए पुन्हा सत्तेवर आली आहे.

### उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात.

# विकास लवांडेंवरील शाईफेकचा राष्ट्रवादीकडून निषेध

## शिक्रापूर पोलिसांना राष्ट्रवादी युवक काँग्रेस शपचे निवेदन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिक्रापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर आळंदी म्हातोबाची येथे प्रवचनकार व कीर्तनकार संग्राम भंडारे यांसह काही युवकांनी धक्काबुक्की करत शाईफेक करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या घटनेचा शिरुर तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निषेध व्यक्त करत आरोपींना तातडीने अटक करण्याची मणी करत शिक्रापूर पोलिसांना निवेदन देण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे हे आळंदी म्हातोबाची येथील कार्यक्रम आटपून जात असताना तेथे आलेल्या कीर्तनकार संग्राम भंडारे व काही युवकांनी विकास लवांडे यांची कार अडवून त्यांना धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिली याबाबत लोणी काळभोर पोलीस स्टेशन येथे संग्राम भंडारे, अक्षय कांचन सह पंधरा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला असून या घटनेचा शिरुर तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निषेध व्यक्त करत पोलिसांना निवेदन देण्यात आले, यावेळी शिरुर तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बच्चू गव्हाणे पाटील, ज्येष्ठ नेते सुरेश थोरात बाजार समितीचे संचालक दत्तात्रय हरगुडे, खरेदी विक्री संघाचे संचालक संभाजी भुजबळ, उद्योजक स्वप्नील करंजे, सुरेश भुजबळ, काकासाहेब चव्हाण, अनिल शिवले, सोमनाथ रासकर, अतुल शिंदे, आरिफ तांबोळी, निलेश जगताप, सुदर्शन मिरचे, सुभाष वडघुले, बबली शिंदे यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान सदर गुन्ह्यातील आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी करत सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख यांना निवेदन देण्यात आले आहे.



शिक्रापूर ता. शिरुर येथे विकास लवांडे यांच्यावरील घटनेचा निषेध व्यक्त करत निवेदन देताना पदाधिकारी

# हिवरे कुंभारमध्ये एकाच पिंजऱ्यात दोन बिबटे जेरबंद

## शिरुर तालुक्यात प्रथमच घडलेली एकमेव दुर्मिळ घटना

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यात बिबटे पकडून माणिकडोह बिबट निवारा केंद्रात दाखल करण्यात येत असताना वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एकाच वेळी दोन बिबटे जेरबंद झाल्याची दुर्मिळ अशी घटना घडली आहे.



> हिवरे कुंभार येथे एकाच पिंजऱ्यात दोन बिबटे अडकल्याची घटना दुर्मिळ असून मादी व बछडा एकाच वेळी पिंजऱ्यात गेल्याने अडकले असावे तसेच हि घटना शिरुर तालुक्यात प्रथमच घडली असल्याचे नियतक्षेत्र वनअधिकारी सोपान अनासुने यांनी सांगितले.

हिवरे कुंभार ता. शिरुर सह पिंपळे खालसा परिसरात वारंवार बिबट्याचे दर्शन होऊन काही पाळीव प्राण्यांवर बिबट्याने हल्ले केले असताना नुकतेच वनविभागाच्या वतीने हिवरे कुंभार व पिंपळे खालसा गावच्या सीमेवर स्वप्नील धुमाळ यांच्या घराजवळ वनविभागाच्या वतीने पिंजरा लावण्यात आलेला होते, आज सकाळच्या सुमारास सदर पिंजऱ्यात दोन बिबटे अडकले असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांना मिळताच नियतक्षेत्र वनअधिकारी सोपान अनासुने, वन्यजीव बचाव पथकाचे शेरखान शेख, गणेश टिळेकर, अमोल कुसाळकर, परमेश्वर दासरे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता शिरुर तालुक्यात प्रथमच एकाच वेळी पिंजऱ्यात अडकल्याचे दिसून आले, यावेळी सदर पथकाने स्वप्नील धुमाळ, खंडू धुमाळ, पांडुरंग धुमाळ, दादा गोडसे, मारुती सुरशे, तानाजी धुमाळ, बापू दरेकर, महेश धुमाळ, कैलास धुमाळ, सागर धुमाळ, संदीप सुरशे, बुवासाहेब धुमाळ यांच्या उपस्थितीत दोन्ही बिबट्यांना ताब्यात घेतले, तर एकाच पिंजऱ्यात अडकलेल्या दोन्ही बिबट्यांची रवानगी माणिकडोह बिबट निवारा केंद्रात दाखल करण्यात आल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी सांगितले.

# डोंगराला लागलेल्या आगीत दोन कुटुंबाचा संसार जळून खाक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील लांडेवाडी येथील डोंगर परिसरात लागलेल्या भीषण आगीत दोन कुटुंबांचे मोठे नुकसान झाले. ही घटना शनिवारी (दि.९) दुपारी घडली. दोन महिलांच्या प्रसंगावधानामुळे दोन चिमुकल्यांचे प्राण वाचल्याने मोठी दुर्घटना टळली.



दर्यावस्ती परिसरातील गुलाब वसंत केवाळे यांच्या गोठ्याला आग लागून जनावरांचा चारा, शेतीचे साहित्य आणि घरगुती वस्तू जळाल्या. सागर दादाभाऊ केदारी यांच्या झोपडीतील संसारोपयोगी साहित्य आगीत भस्मसात झाले. यावेळी झोपडीत असलेल्या माही सागर केदारी (वय ८ महिने) आणि शिवांश गुलाब केवाळे (वय १० महिने) या बालकांना महिलांनी धाव घेत बाहेर काढल्याने अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच खंडेराव आढळराव, अभिजित आढळराव पाटील, प्रदीप आढळराव पाटील, सोमनाथ आढळराव पाटील, अविनाश आढळराव पाटील आणि वनमजूर रामभाऊ उभे यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. महिलांनी वेळेवर धाव घेतल्यामुळे दोन निष्पाप बालकांचे प्राण वाचले. आगीनंतर कुटुंबांवर मोठे आर्थिक संकट आले असून, शासनाने तातडीने मदत करून नुकसानग्रस्तांना आधार द्यावा, असे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष खंडेराव आढळराव पाटील यांनी सांगितले.

# श्री सिद्धेश्वर विद्यालय नायगावचा एसएससी परीक्षेचा १०० टक्के निकाल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुरंदर :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील श्री सिद्धेश्वर विद्यालय, नायगाव यांनी एसएससी परीक्षेत शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील परीक्षेला बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. या यशामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परीक्षेत कु.सानिका बाळासो कदम हिने ९३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु.सिद्धी अरविंद खेसे हिने ८८.२० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला तर कु.ऋतुजा रोहिदास खेसे हिने ८५.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच कु. सायली विकास फडतरे हिने ८३ टक्के गुणांसह चौथा क्रमांक मिळवला असून प्रथमेश नितीन जगताप याने ८१.४० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक पटकावला.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध गुणवर्गातही उल्लेखनीय यश मिळवले आहे. ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारा १ विद्यार्थी, ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ४ विद्यार्थी, ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ८ विद्यार्थी, ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ५ विद्यार्थी, ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ३ विद्यार्थी तर ३५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे २ विद्यार्थी आहेत.

या यशाबद्दल पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सतीश उरसळ,कार्याध्यक्ष अजित निगडे,उपाध्यक्ष बापू कुंजीर,सचिव उत्तम निगडे, खजिनदार शांताराम कटके तसेच सर्व संचालक मंडळ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आणि मुख्याध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

विद्यालयाच्या या यशामुळे व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण यशाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.नायगाव ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले आहे.

# शारदा कन्या विद्यामंदिर राहाता, विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** विद्यालयाचा इयत्ता दहावी (एस.एस.सी.) बोर्ड परीक्षा निकाल ९१.५६% लागला असून यामध्ये एकूण परीक्षेला प्रविष्ठ विद्यार्थी – १६६, परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी – १५२, विशेष प्राविण्य सह उत्तीर्ण– ३०, प्रथम श्रेणीत उत्तीर्ण – ५३,द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण – ५०,पास श्रेणी उत्तीर्ण – १९ यामध्ये विद्यालयातील प्रथम तीन विद्यार्थी प्रथम क्रमांक कु. खंदारे अंतरा प्रवीण ८७.८०%,व्दितीय क्रमांक,कु. खंदारे अक्षरा प्रवीण ८७.६०%, तृतीय क्रमांक कु. वाघ हर्षदा निलेश ८७.२०%.

विद्यालयातील इयत्ता दहावी (एस.एस.सी.) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. या विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन साळवे आर. व्ही.– मुख्याध्यापक, देशमुख आर. बी. पर्यवेक्षक,विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन.चंद्रकांत दळवी, संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, विभागीय अध्यक्ष आ. आशुतोष काळे, सहसचिव (उ.शि.) मेनकुदळे एस. जी, सहसचिव (माध्य.) . बी. एन. पवार, विभागीय अधिकारी बोडखे, सहाविभागीय अधिकारी नाईकवाडी,.तोरणे, स्कूल कमिटी रमेश शिंदे, शालेय व्यवस्थापन व विकास समिती व इतर सर्व शिक्षक– शिक्षकेतर सेवक वृंद व आजी – माजी विद्यार्थी तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पालक यांनी अभिनंदन केले.

# दौंड शहरात मोकाट जनावरांचा हैदोस;

## अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची नगरपालिकेकडे तक्रार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** दौंड शहरातील शासकीय कार्यालयांचा परिसर आणि मुख्य रस्त्यांवर वाढलेल्या मोकाट जनावरांच्या सुळसुळाटामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या गंभीर समस्येची दखल घेत 'अखिल भारतीय ग्राहक पंचायती'ने नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी पत्र देऊन कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दौंड शहरातील पोलीस स्टेशन परिसर, नगर परिषद कार्यालय, आणि राज्य राखीव पोलीस बल (एसआरपीएफ) गट क्र. ५ व ७ च्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात मोकाट गाई, बैल आणि कुत्र्यांचा वावर वाढला आहे. ही जनावरे रस्त्याच्या मधोमध थांबत असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असून अपघाताची शक्यता बळावली आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे उपाध्यक्ष ॲड. नानासाहेब साखरे यांनी दिलेल्या पत्रात मोकाट जनावरांमुळे शासकीय कार्यालय परिसरात मोठ्या प्रमाणात घाण पसरत आहे. यामुळे कामासाठी येणाऱ्या नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यावरील जनावरांमुळे वाहनधारकांना प्रवास करणे कठीण झाले आहे. दुर्गंधी आणि जनावरांच्या उपद्रवामुळे शासकीय कामकाज करताना मोठी गैरसोय होत असल्याचे नमूद केले आहे. "या परिसरातील सर्व मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि परिसर स्वच्छ व सुरक्षित राहील याची दक्षता घ्यावी," अशी मागणी ग्राहक पंचायतीने केली आहे. या निवेदनावर उपाध्यक्ष नानासाहेब साखरे, तालुका कृषी कमिटी प्रमुख सोमनाथ सोडनवर आणि महिला प्रतिनिधी आरती साखरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लग्नाच्या गडबडीतही शिक्षणाला प्राधान्य; प्रियंका पोळ हिचा प्रेरणादायी आदर्श

■ जनप्रवास प्रतिनिधी

**यवत :** लग्न म्हणजे प्रत्येक मुलीच्या आयुष्यातील महत्त्वाचा आणि भावनिक क्षण. लग्नाच्या तयारीत, रुढी–परंपरा आणि विविध कार्यक्रमांमध्ये अनेकदा शिक्षण किंवा करिअर मागे पडते. मात्र वडगाव दरेकर (ता. दौंड, जि. पुणे) येथील प्रियंका पोळ हिने या सर्व गोष्टींना बाजूला ठेवत शिक्षणाला प्राधान्य देत एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.



> **आधी शिक्षण मग बाकीचं काही!**
>
> लग्न हा आयुष्यातील महत्त्वाचा क्षण आहे, पण शिक्षण हे भविष्यासाठी तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे लग्नाच्या गडबडीतही मी परीक्षेला प्राधान्य दिले. प्रत्येक मुलीने आधी स्वतःच्या शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
>
> - प्रियंका पोळ

प्रियंका पोळ ही बी.एड. द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत असून तिचे वार्षिक परीक्षा सत्र २८ एप्रिल ते ५ मे २०२६ या कालावधीत सुरू होते. तिचे परीक्षा केंद्र पाटस येथील सुभाष अण्णा कुल अध्यापक विद्यालय येथे होते. याच दरम्यान १ मे २०२६ रोजी तिचा विवाह दौंड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

लग्नाची धावपळ, नातेवाईकांची गर्दी आणि पारंपरिक विधी यामध्ये अनेक जणी शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात; मात्र प्रियंका हिने आपल्या करिअरला महत्त्व देत परीक्षेला प्राधान्य दिले. लग्नाच्या कालावधीत असलेल्या विविध रुढी–रीती आणि परंपरा यांना मर्यादित ठेवत तिने नियमितपणे परीक्षा दिल्या.

विशेष म्हणजे लग्नानंतरही तिच्या शिक्षणासाठी तिचे पती प्रशांत यांनी तिला मोलाची साथ दिली. ते स्वतः प्रियंकाला परीक्षा केंद्रावर घेऊन जात होते आणि अभ्यास व परीक्षेसाठी सातत्याने प्रोत्साहन देत होते. त्यामुळे शिक्षण आणि संसार यांचा समतोल साधता येतो हा सकारात्मक संदेश या दाम्पत्याने समाजासमोर ठेवला आहे.

# 'त्रिमूर्ती' विद्यालयाचा विज्ञान शाखेचा ९८.९० टक्के तर कला शाखेचा ६७.७४ टक्के निकाल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** त्रिमूर्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने इयत्ता बारावीच्या परीक्षेत यंदा उल्लेखनीय यश संपादन करत उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या विज्ञान शाखेचा ९८.९० टक्के, तर कला शाखेचा ६७.७४ टक्के निकाल लागला आहे.



विज्ञान शाखेत ऋषीकेश ज्ञानेश्वर बहिरट याने ७६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सिद्धांत विनोद बोकाडिया (६७.५०%), रागिनी रमेश पुंड (६५.६७%), स्नेहल रविंद्र पटारे (६४.८३%) आणि अमृता रमेश शिंदे (६४.१७%) यांनी अनुक्रमे पुढील क्रमांक मिळवले.

कला शाखेत अपूर्व प्रकाश वंजारे हिने ६३.१७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. साक्षी अशोक साप्ते (६१.५०%), रुक्सार अहमद शेख (५९%), राहुल दत्तात्रय आखाडे (५४.१७%) आणि प्रदीप रावसाहेब सानप (५३.८३%) यांनी यश संपादन केले.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सुमतीताई घाडगे, उपाध्यक्ष स्नेहल घाडगे, विश्वस्त चेतन चव्हाण तसेच संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच विद्यालयाचे प्राचार्य संतोष जावळे, विभाग प्रमुख नितीन साळवे, संदीप काळे, अर्चना जगताप, ललिता गारूळे, कृष्णा शिंदे, कल्याणी भद्रे, अश्विनी खुरुद, मयुरी राऊत, संदीप कांबळे, नंदिनी सरोदे, विकास कौटे, शिवानी बनकर, वस्तीगृह अधीक्षक रवी कोरडे, गीतांजली गवारे, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ आणि पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील वारकरी बाल संस्कार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद,१६० विद्यार्थ्यांचा सहभाग

■ जनप्रवास प्रतिनिधी

**नेवासा :** तीर्थक्षेत्र नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात उन्हाळयाच्या सुट्टीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने आयोजित केलेल्या पंधरा दिवशीय वारकरी बाल संस्कार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून पहिल्याच दिवशी १६० विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभाग नोंदवला आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे मार्गदर्शक वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री हे या शिबिरातील मुलांना अमूल्य मार्गदर्शन करत आहेत. पहाटे ४ वाजेपासून शिबिराचा दिनक्रम सुरू होतो यामध्ये सकाळी साडेपाच वाजता हनुमान चालीसा पठण कार्यक्रम पहाटे सहा वाजता आरती झाल्यानंतर संतसेवक आदिनाथ महाराज पांगरे व संतसेवक दामोदर पवार हे मुलांकडून योगासने करून घेतात

या नंतर उपस्थित बाल वारकऱ्यांना अल्पोपहार दिला जातो व त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक गुरुवर्य वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री हे बाल वारकऱ्यांचा गीता पाठ घेतात, गीता पाठ झाल्यानंतर मंदिरात उपस्थित असलेल्या महाराज मंडळींपैकी वेगवेगळ्या अभंग ओवी पाठ करून घेतल्या जातात.गहिनीनाथ महाराज आढाव हे देखील प्रशिक्षण देण्यासाठी वेळ देत आहे.



दुपारी बारा वाजता भोजन झाल्यानंतर मुलांकडून वेगवेगळे खेळ गप्पागोष्टी असे विरंगुळा प्राप्त करणारे कार्यक्रम घेतले जातात त्यानंतर दोन तास विश्रांती त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त गायनाचार्य ज्ञानदेव माऊली शिंदे हे मुलांना मार्गदर्शन करून अभंग गायनाच्या संदर्भात मार्गदर्शन करतात त्यानंतर उपस्थित मृदुंगाचार्य महाराज मंडळीच्या मार्फत मृदंगाचे प्रशिक्षण दिले जाते

त्यानंतर बाल वारकऱ्यांना विविध अभंगासह भजन शिकविले जाते आणि सायंकाळी ५ वाजता सामुदायिक हरिपाठ घेतला जातो,सायंकाळी ७ वाजता शिबिरातील सर्व बालवारकऱ्यांना सायंकाळचे भोजन दिले जाते,सकाळी श्रीमद भगवत गीतेची तसेच रात्री वेगवेगळ्या स्तोत्रांची संथा गुरुवर्य देविदासजी महाराज म्हस्के बाबा हे देत आहे.

## संक्षीप्त वृत्त

### तंत्रज्ञानाच्या अंतर्भावाने उद्योगांचा विकास झपाट्याने होईल; पद्मश्री मिलिंद कांबळे यांचे प्रतिपादन;

### भारतातील पहिल्या तीन दिवसीय 'ईआरपी प्रदर्शना'चे उद्‌घाटन




■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** ''देशाच्या विकास प्रक्रियेत महत्वाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम (एमएसएमई) उद्योगांना सुयोग्य पद्धतीने कार्यान्वित करण्यासाठी, तसेच विकासाला गती देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. एआय, डिजिटायझेशन यामुळे उद्योगांची उत्पादकता वाढण्यास मदत होईल,'' असे प्रतिपादन दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज अर्थात डिक्कीचे संस्थापक पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी केले. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळेच २०४७ पर्यंत भारताची विकसनशील देश ही ओळख पुसून विकसित देश अशी ओळख निर्माण होईल, असेही त्यांनी नमूद केले.

पिंपरी-चिंचवड येथील ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये एक्स्पोनॉमिक्स इव्हेंट्सच्या वतीने आयोजित भारतातील पहिल्या 'ईआरपी' औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन मिलिंद कांबळे बोलत होते. प्रसंगी संयोजक 'एक्स्पोनॉमिक्स'चे संचालक सागर अहिवळे व मिलिंद हडप, आरती भोसले-अहिवळे, सनवन टेक्नॉलॉजीच्या संचालक श्रद्धा कुलकर्णी, अप्लिका कन्सल्टन्सीचे प्रमुख रॉड अल्बुकर्क, रिंगफिडर ट्रान्समिशनचे सीईओ दीपान रामलिंगम, इंद्रायणी इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष महेंद्र फणसे, रोटरी क्लब ऑफ पिंपरी इलाईटचे इरफान आवटे, प्रसाद कुलकर्णी, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे सीईओ दिलीप बटवाल, डॉ. प्रकाश मुंडे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ध्वनिचित्रफितीद्वारे प्रदर्शनाचे कौतुक केले. यावेळी प्रदर्शनाविषयी माहिती असलेल्या मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. या तीन दिवसांच्या प्रदर्शनात उत्पादन, वित्त, लॉजिस्टिक्स, रिटेल, हेल्थकेअर, कन्स्ट्रक्शन आणि एडटेक या क्षेत्रांतील अत्याधुनिक ईआरपी आणि डिजिटल सोल्युशन्स सादर होणार आहेत. तज्ज्ञांची मार्गदर्शन सत्रे, कार्यशाळा व प्रात्यक्षिकांचा अनुभव घेता येणार आहे. हे प्रदर्शन येत्या शनिवारपर्यंत (ता. ९) सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

### पुण्यात 'भारत की बेटी अवॉर्ड २०२६' उत्साहात संपन्न

### मातृदिनानिमित्त विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा गौरव




■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** मीडिया वर्ल्ड तर्फे आयोजित 'भारत की बेटी अवॉर्ड २०२६' हा भव्य सन्मान सोहळा मातृदिनाच्या पार्श्वभूमीवर पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, पुणे येथे उत्साहात संपन्न झाला. समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, कलाकार, उद्योजक आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून डॉ. नीलमताई गोऱ्हे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये अंकिता पाटील ठाकरे तसेच यांचा समावेश होता. कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेते देव गिल, मिस अर्थ इंडिया २०२५ कोमल चौधरी, अभिनेत्री केसरी तसेच अभिनेता प्रसाद शिखरे, संतोष जगताप, मारुती भंडारी, शशिकांत कांबळे, गीतसानिया कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती लाभली. महाराष्ट्रासह देशभरातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या महिलांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन मीडिया वर्ल्ड चे संस्थापक सुमित अंबेकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. तसेच श्री प्रमोद गोळे, व व्यावसायिक मार्गदर्शक एस एस सावंत यांचे सहकार्य लाभले.

यावेळी बोलताना श्री. सुमित अंबेकर म्हणाले, 'भारत की बेटी अवॉर्ड २०२६' हा समाजात प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा प्रयत्न आहे. विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कार्याची समाजाला प्रेरणा मिळावी हा या उपक्रमामागील उद्देश आहे. देशातील एक लाख महिलांना हा सन्मान मिळवून देण्याचा संकल्प देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. नीलमताई गोऱ्हे म्हणाल्या, आज महिला शासन, शिक्षण, आरोग्य, उद्योग, समाजकारण आणि सार्वजनिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत आहेत. अशा महिलांचा गौरव केल्याने समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण होते.

'नारी शक्ती - राष्ट्र शक्ती' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमासाठी पुणे शहरात विविध सामाजिक माध्यमांद्वारे जनजागृती मोहीम, होर्डिंग्ज आणि प्रचार उपक्रम राबविण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुनील धनगर आणि सौ. मयुरी येवले यांनी केले तर आभार इसे एस. एस. सावंत यांनी मानले.

# कर्तृत्वाचा सन्मान : तस्मिया अब्दुलभैय्या शेख यांचा 'स्टार्टअप महाराष्ट्र' राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

■ जनप्रवास तालुका वार्ताहर

**नेवासा :** हॉटेल ताज विवांता नवी मुंबई येथे पार पडलेल्या महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा पार पडला जिद्द, चिकाटी आणि समाजाप्रती असलेली तळमळ यांच्या बळावर शून्यातून स्वत:चे विश्व निर्माण करणाऱ्या तस्मिया शेख यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. 'छ्शुी१८ लोकमत' आणि स्टार्टअप महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात तस्मिया शेख यांना सामाजिक आणि उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते, तसेच मंदार फणसे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सन्मान सोहळा नवी मुंबई येथे दिमाखात पार पडला.

**शून्यातून उभी केलेली यशस्वी वाटचाल**

तस्मिया शेख यांचा प्रवास हा संघर्षातून यशाकडे नेणारा प्रेरणादायी प्रवास आहे. कोणत्याही मोठ्या आर्थिक किंवा राजकीय वारशाशिवाय, केवळ स्वत:च्या कार्यक्षमतेच्या आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी महाराष्ट्रभर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. व्यवसायासोबत समाजसेवेची सांगड घालत त्यांनी अनेकांसाठी प्रेरणास्थान निर्माण केले आहे.

**बेरोजगारांसाठी आशेचा किरण**

आज बेरोजगारी ही गंभीर समस्या असताना, तस्मिया शेख यांनी अनेक बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या या उपक्रमांमुळे अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला आहे. त्यांच्या निस्वार्थ कार्याची दखल आता राज्यस्तरावर घेण्यात आली आहे.

कुकाणा येथे आयोजित भव्य रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याच्या माध्यमातूनही त्यांनी



अनेक युवकांना मार्गदर्शन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

**कुटुंबीयांकडून अभिमान व्यक्त**

तस्मियाची आज इतक्या मोठ्या व्यासपीठावर दखल घेतली जात आहे, हा माझ्यासाठी तसेच आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी व नेवासा तालुक्यातील माझ्या माय-बाप जनतेसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. तिची जिद्द, मेहनत आणि समाजासाठीची तळमळ आज फळाला आली आहे,

अशी भावना तस्मिया यांचे पती राष्ट्रवादीचे नेते अब्दुल भैय्या शेख यांनी व्यक्त केली.

तस्मिया शेख या नेवासा तालुक्यातील राष्ट्रवादीचे युवा नेते अब्दुल भैय्या शेख यांच्या पत्नी असून ग्रामपंचायत सदस्या हकिमाबी लालाभाई शेख यांच्या सुनबाई आहेत. त्या कायम सर्वसामान्यांच्या मदतीसाठी धावून जात असल्याने समाजात त्यांच्याविषयी विशेष आदर व्यक्त केला जातो.

माजी आमदार पांडुरंग अभंग तसेच माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे पाटील यांनी तस्मिया शेख यांचे अभिनंदन करत, नेवासा तालुक्याचे नाव राज्यभर उज्ज्वल केल्याबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या.

**समाजाचा गौरव वाढवणारे यश**

हा पुरस्कार केवळ तस्मिया शेख यांचा वैयक्तिक सन्मान नसून, मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्याची हिंमत ठेवणाऱ्या प्रत्येक महिलेच्या कर्तृत्वाचा गौरव आहे. त्यांच्या या यशामुळे समाजाची मान अभिमानाने उंचावली असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## केशर मल्टीस्टेटला संजीवनी उद्योग समूहाचे बिपीनदादा कोल्हे यांची सदिच्छा भेट

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** शैक्षणिक, सहकार, उद्योग तसेच साखर कारखानदारी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत देशभरात 'कोल्हे पॅटर्न'ची ओळख निर्माण करणारे संजीवनी उद्योग समूहाचे सर्वेसर्वा बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी नुकतीच केशर उद्योग समूहाला सदिच्छा भेट दिली.

स्वर्गीय माजी मंत्री शंकरराव कोल्हे यांच्या दूरदृष्टीतून उभ्या राहिलेल्या संजीवनी उद्योग समूहाच्या कार्याचा वारसा पुढे नेत असलेल्या बिपीनदादा कोल्हे यांनी जिल्ह्यात अग्रेसर असलेल्या केशर उद्योग



समूह तसेच केशर मल्टीस्टेटच्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. यावेळी केशर मल्टीस्टेटचे चेअरमन तथा युवा नगरसेवक सागरदादा तनपुरे यांनी बिपीनदादा कोल्हे यांचा सत्कार केला. केशर उद्योग समूह व केशर मल्टीस्टेटच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या सामाजिक, आर्थिक व विकासाभिमुख उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त करत बिपीनदादा कोल्हे यांनी संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी बाळासाहेब गाडे, ॲड. जालिंदर ताकटे, सचिन वराळे, गणेश गाडे, सुजय काळे, गोरखनाथ घोरपडे, एकनाथ बर्ड आदी मान्यवर उपस्थित होते.

## राहुरीच्या पंडित जवाहरलाल नेहरू उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** बागवान एज्युकेशन अँड सोशल ट्रस्ट संचलित पंडित जवाहरलाल नेहरू उर्दू हायस्कूल, राहुरी या विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल यंदा १०० टक्के इतका लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत शाळेच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये अक्सा इक्बाल शेख हिने ७८.६० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला. मारिया खालिद फारुकी हिने ७५.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तर बागवान जैनब उबेदुर्रहेमान आणि सय्यद सदफ रियाज यांनी प्रत्येकी ७४.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकाविला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक बागवान इनामूलहसन अब्दुलसलाम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून




पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच शिक्षक व पालकांच्या सहकार्यामुळेच विद्यार्थ्यांना हे यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांमध्ये शेख अलमासबेगम मारूफ, शेख शगुफ्ता खानमोहम्मद, सय्यद नुजहत सुलताना तसेच शेख हकीम हमीद यांचा विशेष सहभाग राहिला. या यशाबद्दल संस्था चालक बागवान उबेदुर्रहेमान अब्दुलसलाम तसेच सर्व विश्वस्तांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## टाकळीभानचा ''भोंदू बाबा'' पोलीसांच्या ताब्यात तंत्रमंत्राच्या नावाखाली महिलेकडून उकळले लाखो रूपये



■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** टाकळीभान येथे तंत्र मंत्राच्या सहाय्याने उतारे काढून जडीबुटी खाण्यास देऊन सुमारे १५ ते १६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिसांनी तालुक्यातील पूर्व भागातील व सध्या शहरात वास्तव्यास असलेल्या एका भोंदू बाबाला गजाआड केले आहे.

अशोक आढाव असे अटक केलेल्या भोंदूबाबाचे नाव असून तो मूळचा तालुक्यातील टाकळीभान येथील रहिवासी असून सध्या तो श्रीरामपूर शहरातील अल्फा हॉस्पीटल मागील झोपडपट्टीत राहत असल्याची माहिती समोर आली आहे.

यप्रकरणी तालुक्यातील पूर्व भागातील एका महिलेने तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. की, फेब्रुवारी २०२३ ते डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये भोंदू अशोक आढाव याने मला होत असलेल्या त्रासावर तंत्र-मंत्राच्या साह्याने उतारे काढून जडीबुटी खाण्यास देऊन दक्षिणा स्वरूपात वऑनलाईन पद्धतीने सुमारे १५ ते १६ लाख रुपये, सोन्याच्या वस्तू घेतल्या, तसेच मी राहत असलेल्या घरी माझ्याकडून शरीर सुखाची मागणी करून मला पकडून माझ्याशी लगट करून मला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

यप्रकरणी भोंदूबाबा अशोक आढाव यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४, ७५ प्रमाणे नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ठ व अघोरी प्रथा जादूटोणा यांना प्रतिबंधक करण्याबाबत च त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी भोंदूबाबा अशोक आढाव यास अटक करुन न्यालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपीच्या वतीने ॲड. अरिफ शेख व ॲड. जावेद शेख यांनी बाजू मांडली. या प्रकरणाचा पुढील तपास तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण धनवटे करत आहेत.

## अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** शिर्डी येथील गोंदकर जमीन खरेदी गैरव्यवहार, अवैध सावकारी व फसवणूक प्रकरणातील प्रमुख आरोपी अशोक खरात याच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत राहता दिवाणी न्यायालयाने आरोपी अशोक खरात याला तब्बल १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे

न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता शिर्डी पोलिसांकडून पुन्हा आरोपी खरातचा ताबा नाशिक पोलिसांकडे दिला जाणार आहे शिर्डीतील गाजत असलेल्या जमीन खरेदी आणि फसवणूक




प्रकरणात आज राहता दिवाणी न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली या सुनावणी न्यायालयाने आरोपी अशोक खरात याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

यापूर्वी न्यायालयाची परवानगी घेत नाशिक पोलिसांकडून शिर्डी पोलिसांनी अशोक खरातचा ताबा घेतला होता त्यानंतर जमीन व्यवहारा संदर्भात खरातची पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळवून शिर्डी पोलिसांकडून चौकशी करण्यात आली.

या चौकशीत अनेक महत्त्वाचे मुद्दे समोर आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे दरम्यान न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर आता अशोक घरातला वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात येणार असून त्यानंतर शिर्डी पोलिसांचा ताफा नाशिककडे रवाना होणार आहे.

नाशिक पोलिसांकडे आरोपी खरात चा ताबा दिला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे या संपूर्ण प्रकरणामुळे शिर्डीसह नाशिक जिल्ह्यातही मोठी खळबळ उडाली असून पुढील तपासात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** खुनाचा प्रयत्न व ॲट्रॉसिटीसारख्या गंभीर गुन्ह्यात सध्या कारागृहात असलेल्या आरोपींच्या नातेवाईकांकडून फिर्यादी, जखमी व साक्षीदारांवर गुन्हे मागे घेण्यासाठी दबाव आणला जात असून, खोट्या गुन्ह्यांत अडकविण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप रिपब्लिकन पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे.

यासंदर्भात रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे व सुरेंद्र थोरात यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, जामखेड तालुक्यातील नान्नज येथे २४ ऑगस्ट २०२५ रोजी सुनील साळवे यांच्या कुटुंबावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात सहा जण गंभीर जखमी झाले होते.

जखमींमध्ये महिला व लहान मुलांचाही समावेश होता. या प्रकरणात खुनाचा प्रयत्न तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असून संबंधित आरोपी सध्या कारागृहात आहेत.

# मुंगूसगावात सर्पदंशाने ११ वर्षीय आराध्याचा मृत्यू; वीज बंदमुळे संतप्त ग्रामस्थांची तीव्र प्रतिक्रिया

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** तालुक्यातील मुंगूसगाव येथे अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून सर्पदंशामुळे अकरा वर्षीय मुलीचा मृत्यू झाला आहे. आराध्या विशाल काकडे हिच्या अकाली निधनामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे रात्री गाव परिसरात वीजपुरवठा खंडित असल्याने ही दुर्घटना घडल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आराध्या ही सुट्टी असल्याने आपल्या मामाच्या घरी गेली होती. सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास जेवणासाठी बोलावण्यात आल्यानंतर ती घराजवळील शेततळ्याकडे हात धुण्यासाठी गेली होती. त्यावेळी तिच्या पायाच्या दोन बोटांमध्ये काहीतरी चावल्याची जाणीव झाल्याने ती तातडीने घरी परतली. पायातून रक्त येत असल्याचे तिने घरच्यांना दाखविल्यानंतर सुरुवातीला खिळा किंवा धारदार वस्तू लागली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात आला.

घरातील काम सुरू असल्याने कोणीही सुरुवातीला सर्पदंशाचा संशय घेतला नाही. जखमेवर चुना लावण्यात आला. मात्र काही वेळातच आराध्याची प्रकृती अचानक बिघडू लागली. तिला उलट्या होऊ लागल्या तसेच तोंडातून फेस येऊ लागल्याने घरच्यांची धावपळ उडाली. दरम्यान, तिच्या भावाने बॅटरी घेऊन शेततळा परिसरात शोध घेतला, मात्र त्यावेळी कोणताही साप आढळून आला नाही.

प्रकृती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी आराध्याला तातडीने कोळगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथून पुढील उपचारासाठी नगर येथे हलविण्यात आले. मात्र उपचारासाठी नेत असताना वाटेतच तिचा मृत्यू



झाला. या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी सकाळी नागरिकांनी शेततळा परिसरात शोधमोहीम राबविली असता कागदाखाली विषारी नाग आढळून आला. तो नाग कात टाकण्याच्या अवस्थेत असल्याचे सांगण्यात आले. संतप्त ग्रामस्थांनी त्याला ठेचून ठार केले.

आराध्या ही विसापूर येथील सरस्वती विद्यालय येथे इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत होती. अभ्यासात हुशार आणि शांत स्वभावाची विद्यार्थिनी म्हणून तिची ओळख होती. तिच्या निधनामुळे मुंगूसगाव, विसापूर, कोळगावसह परिसरात शोक व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर सायंकाळच्या वेळेत वीजपुरवठा खंडित करू नये तसेच वीजपुरवठ्याची वेळ बदलावी, अशी मागणी उपसरपंच अनिल कानगुडे आणि तंटामुक्ती अध्यक्ष विशाल जठार यांनी केली आहे.

**सायंकाळच्या वीजबंदमुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण**

सध्या राज्यात शेतीसाठीचा वीजपुरवठा सायंकाळी सहा ते रात्री नऊ या वेळेत बंद ठेवण्यात येत असल्याने ग्रामीण भागात अंधाराचे साम्राज्य निर्माण होत आहे. शेततळे, रस्ते आणि वस्ती परिसर अंधारात असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. उन्हाळ्यात साप, नाग आणि इतर वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असल्याने धोका अधिक वाढला आहे.

# सावेडी नाका बस स्थानकाच्या इमारतीचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

## प्रवाशांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध होणार - पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सावेडी नाका बस स्थानकाच्या इमारतीच्या कामाला अखेर मुहूर्त लागला असून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न झाला. आमदार संग्राम जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वाच्या कामाला चालना मिळाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, सावेडी बस स्थानकाच्या माध्यमातून प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. अनेक ठिकाणी बस स्थानकांची अवस्था वाईट असून अस्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असतो. मात्र आता एसटी महामंडळ प्रवाशांसाठी दर्जेदार सुविधा देण्यावर भर देत आहे. शिवशाही, शिवाई, इलेक्ट्रिक बस, लाल परी आणि हिरकणी बस अशा विविध सेवांमुळे प्रवाशांना अधिक चांगला अनुभव मिळत आहे.

ते पुढे म्हणाले की, प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन महिलांना ५० टक्के सवलत, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास अशी सुविधा देण्यात आली आहे. सुरक्षित व सुलभ प्रवासामुळे नागरिकांचा एसटीकडे ओढा वाढला असून महामंडळही फायद्यात येत आहे.



आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या माध्यमातून सावेडी बस स्थानकासाठी सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. सावेडी उपनगराचा विस्तार झपाट्याने होत असून या भागात नागरिकांची संख्या वाढत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी सावेडी नाका येथे बस स्थानक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या ठिकाणावरून नागरिकांना सहज प्रवास करता येईल. शासनाच्या सुविधा नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

या भूमिपूजन सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, माजी महापौर बाबासाहेब वाकळे माजी उपमहापौर अनिल बोरुडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, मनोज कोतकर, सुरेश बनसोडे, मनोज दुल्लम, महेश लोंढे, विनायक देशमुख, रवींद्र बारस्कर, करण कराळे, दत्ता गाडळकर, नगरसेविका शारदाताई ढवण, सुजाता पडोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शेतात कांदा काढणी करत असताना आली चक्कर; शेतमजुर महिलेचा दुर्दैवी मृत्यू

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निरगुडसर :** शेतात कांदा काढणीच्या कामासाठी आलेल्या एका महिलेचा अचानक मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नकुशा बाळू सुपे वय ३३ वर्षे, या मूळच्या खेड तालुक्यातील वाडा-सुपेवाडी येथील रहिवासी होत्या. त्या कांदा काढणीच्या कामासाठी आमोंडी येथे आल्या होत्या. दुपारच्या कडक उन्हात काम सुरू असताना त्यांना अचानक चक्कर आली आणि त्या शेतातच त्या कोसळल्या. सोबतच्या कामगारांनी त्यांना तातडीने शिनोली येथील खासगी दवाखान्यात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे



डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी मंचर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे सुपे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून वाढत्या तापमानामुळे प्रशासनाने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

# ‘...म्हणून कार्यकर्ता धरू शकतो परिसरावर पदर’

### आमदार हेमंत रासने यांच्यासह मान्यवरांनी केले मातृशक्तीला वंदन



■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** प्रसंगी घरादाराकडे दुर्लक्ष करून समाजासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना खंबीर पाठिंबा देण्याचे कार्य त्यांच्या माता करीत असतात. त्या कार्यकर्त्यांना पदराखाली घेतात म्हणून कार्यकर्ता आपल्या संपूर्ण परिसरावर मायेचा आणि कार्याचा पदर पांघरू शकतो, असे प्रतिपादन आमदार हेमंत रासने यांनी केले.

जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून जय गणेश व्यासपीठाच्या वतीने विघ्नहर्ता कार्यकर्ता मातृगौरव सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असलेल्या त्यांच्या मातांचा गौरव करण्यात आला.

आमदार रासने यांच्यासह राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे, संत साहित्यिक डॉ. आरती दातार यांच्या हस्ते प्रसाद, महावस्त्र, सन्मानपत्र आणि तुळशीचे रोप देऊन मातांचा गौरव करण्यात आला. यावेळी युवराज निंबाळकर, उदय जगताप , शिरीष मोहिते ,विवेक खटावकर व राजा कदम मान्यवर उपस्थित होते, जय गणेश व्यासपीठ मधील पाच मंडळांचा सहभाग होता अखिल मंडई मंडळाचे विश्वास भोर , शनिवार पेठ येथील ओम हरिवेश्वर मित्र मंडळाचे अध्यक्ष राहुल जाधव, गुरुवार पेठ येथील वीर शिवराज मित्र मंडळाचे किरण सोनीवाल, बुधवार पेठ येथील साईनाथ मंडळ ट्रस्ट पियूष शहा, श्री शिवाजी मित्र मंडळाचे प्रल्हाद भाऊ थोरात यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते

लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी लोकांचे संघटन करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. स्वातंत्र्योत्तर काळात विकासाची फळे समाजाच्या तळागाळापर्यंत नेऊन सुराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून केला जातो. कार्यकर्ता हा या मंडळांचा कणा आहे आणि आपल्या मुलांचे संसार सांभाळून त्यांना समाजकार्यासाठी मोकळीक देणाऱ्या माता या निश्चितपणे वंदनीय आहेत. गौरवाला पात्र आहेत, असे रासने यांनी नमूद केले. समाजाचे आणि देशाचे भवितव्य घडवणारी सुसंस्कृत नवी पिढी घडवणे हे देखील एक मोठे सामाजिक कार्य आणि करियर आहे, असे मत ह भ प चारुदत्त आफळे यांनी व्यक्त केले. सध्याच्या काळात नव्या पिढीतील अनेक जण न्यूनगंडाने ग्रस्त असून त्यांना लग्न करण्यात अथवा मुले जन्माला घालण्यात रस असत नाही.

# श्रीगोंदा नगरपरिषदेत ‘सोमरस पार्टी’ प्रकरण गाजले; सफाई कर्मचाऱ्यांचा कामबंद आंदोलनाचा इशारा

■ जनप्रवास वार्ताहार

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा नगरपरिषदेतील काही पदाधिकारी व नगरसेवकांशी संबंधित कथित ‘सोमरस पार्टी’ प्रकरणामुळे शहरातील राजकीय आणि प्रशासकीय वातावरण ढवळून निघाले आहे. सफाई कर्मचाऱ्यांविषयी अपमानास्पद भाषा वापरल्याचा आरोप समोर आल्यानंतर नगरपरिषदेतील कर्मचारी संतप्त झाले असून, त्यांनी या प्रकाराविरोधात तीव्र भूमिका घेत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

माहितीनुसार, एका माजी नगरसेवकाच्या मुलीच्या साखरपुड्यानिमित्त काही नगरसेवक व पदाधिकारी नाशिककडे रवाना झाले होते. प्रवासादरम्यान रात्री एका हॉटेलमध्ये पार्टीचे आयोजन करण्यात आले. यावेळी काही जणांनी मद्याच्या नशेत सफाई कर्मचाऱ्यांबाबत अवमानकारक शब्द वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच मागासवर्गीय समाजाविषयीही आक्षेपार्ह वक्तव्य झाल्याची चर्चा शहरात रंगली आहे.



या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या वाहन चालकाने संताप व्यक्त करत गाडीची चावी वाहनावर ठेवून आळेफाटा येथून बसने थेट श्रीगोंद्याकडे परतल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती नगरपरिषद कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचताच सफाई विभागातील महिला व पुरुष कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कामगारांना कमी लेखण्याची मानसिकता सहन केली जाणार नाही, असा इशारा देत कर्मचाऱ्यांनी शनिवारी कामबंद आंदोलन पुकारले.

यानंतर नगराध्यक्षांच्या दालनात तातडीची बैठक घेण्यात आली. बैठकीस नगराध्यक्ष, काही नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी बैठकीत आपली भूमिका स्पष्ट करत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

बैठकीदरम्यान काही नगरसेवकांनी घडलेल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त करत भविष्यात अशी घटना पुन्हा होणार नाही, अशी ग्वाही दिली. मात्र, आरोपांच्या भोवऱ्यात असलेले संबंधित नगरसेवक बैठकीस गैरहजर राहिल्याने संशय आणि चर्चांना अधिक उधाण आले आहे.

# राहतात १३ वर्षीय ओंकारचा संशयास्पद मृत्यू

## चालकाने जाणीवपूर्वक गाडी अंगावर घातली; संतप्त ग्रामस्थांचा पोलीस ठाण्यासमोर ठिय्या

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे** राहाता (प्रतिनिधी) आजी सोबत डफाचा खेळ पहावयास निघालेल्या तेरा वर्षीय चिमुकल्या ओंकार गायकवाड( वय १३ वर्षे) याचा कारच्या धडकेत मृत्यू झाला मात्र हा केवळ अपघात नसून चालकाने जाणीवपूर्वक गाडी मागे पुढे घेऊन ओंकारच्या अंगावरून घातल्याचा खळबळजनक आरोप करत आजोबांनी न्यायासाठी आर्त हाक दिली आहे या घटनेने संतप्त झालेल्या कुटुंबियांनी, नातेवाईकांनी व ग्रामस्थांनी शनिवारी ओमकारचा मृतदेह थेट राहता पोलीस ठाण्यासमोर आणून ठिय्या आंदोलन केले पोलिसांनी या संदर्भात चार आरोपींवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले आहे

गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमारास ओंकार गायकवाड हा आपल्या आजी पुष्पा पांडुरंग गायकवाड सोबत डफाचा खेळ पाहण्यासाठी शहरातील शनी चौकाकडे जात होता.कृष्ण मंदिरासमोर भरधाव वेगाने आलेल्या कारने आधी आजीला आणि नंतर ओंकारला जोरात धडक दिली. प्रत्यक्षदर्शी आणि कुटुंबियांच्या दावानुसार ओंकार खाली पडल्यानंतर कार चालकाने माणुसकीला काळीमा फासत गाडी पुन्हा मागे पुढे घेऊन त्याच्या पोटावरून चाक फिरविले गंभीर जखमी ओंकारला तातडीने शिर्डी व त्यानंतर नाशिक येथील रुग्णालयात हलवण्यात आले मात्र शनिवारी सकाळी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला ही घटना घडल्यानंतर ग्रामस्थांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधला होता मात्र पोलिसांनी सुरुवातीला गांभीर्य दाखवले नसल्याचा आरोप केला जात आहे विशेष म्हणजे संबंधित कारची काच फुटलेल्या अवस्थेत पोलीस ठाण्यात जमा असल्याचे दिसून आले मात्र घटनेच्या वेळी गाडीला काहीच झाले नव्हते त्यामुळे या प्रकारात काहीही काळेबेरे असल्याचा संशय बळकावला आहे .आमचा नातू एकुलता एक होता. आमचे कोणाशी वैर नाही.मग त्याला



इतक्या निर्दयपणे का मारले? असा सवाल आजोबा पांडुरंग गायकवाड यांनी अश्रू भरल्या डोळ्यांनी उपस्थित केला.पोलीस ठाण्यासमोर मृतदेह आणून करण्यात आलेल्या तीव्र आंदोलनानंतर पोलीस यंत्रणा हालली.शनिवारी सायंकाळी पोलिसांनी या प्रकारातील तीन संशयित व्यक्तींना ताब्यात घेतले रात्री उशिरापर्यंत आरोपी संस्कार विखे(चालक),गौरव भोसले, गोकुळ चिकणे ,व अमन पाववाला या चौघांच्या विरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हा दाखल करण्यात आला .

> ही घटना केवळ धक्कादायक नाही, तर संतापाच्या पलीकडची आहे.निष्पाप मुलाला नशेत गाडी चालवणाऱ्या व्यक्तीने चिरडून टाकले आणि त्याचवेळी त्याच्या आजीलाही उडवले हा प्रकार म्हणजे सरळ सरळ माणुसकीचा खून आहे .स्थानिक लोक तातडीने पोलीस स्टेशनला धाव घेत होते तेव्हा पोलीस अधिकाऱ्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केली. याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत.न्याय मिळाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही
>
> – डॉ.राजेंद्र पिपाडा, भाजप नेते

> केवळ तेरा वर्षाच्या कोवळ्या मुलाचा अशा प्रकारे अंत झाल्याने संपूर्ण राहता शहरावर शोककळा पसरली आहे ओंकार आणि त्याच्या आजीला धडक दिल्यावर पुन्हा गाडी मागे घेऊन त्याच्या अंगावर चालवली जाते हे अत्यंत क्रूर आहे.ग्रामस्थांनी माहिती देऊनही पोलिसांनी वेळीच कारवाई का केली नाही? हा चिंतेचा विषय असून शहरातील वाढती गुन्हेगारी आणि कायदा व सुव्यवस्था आता संशोधनाचा विषय ठरत आहे .
>
> – ॲड. प्रवीण गांधी

# अहिल्यानगर शहर उपविभागातील ५ सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पाऊल उचलत शहर उपविभागातील पाच सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई केली आहे. कोतवाली, तोफखाना आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या या आरोपींना जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

हद्दपार करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अजित रामदास केकाण (रा. सारसनगर), करण खंडू पाचारणे (रा. एमआयडीसी नागापूर), गौरव प्रभाकर साळवे (रा. सिद्धार्थनगर), मंगेश अरुण थोरात (रा. यशोदानगर) आणि संग्राम रमेश गिते (रा. केडगाव) यांचा समावेश आहे. संबंधित आरोपींविरुद्ध शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये मारामारी, दहशत निर्माण करणे, धमकी व इतर स्वरूपाचे एकूण अनेक गुन्हे दाखल आहेत.

प्रभारी अधिकारी कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपारीचे प्रस्ताव सादर केले होते. या प्रस्तावांची चौकशी करून डॉ. दिलीप टिपरसे, उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर शहर विभाग यांनी अहवाल उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे पाठविला होता.

यानंतर उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी गौरव प्रभाकर साळवे व संग्राम रमेश गिते यांना दोन वर्षांसाठी, तर अजित केकाण, करण पाचारणे व मंगेश थोरात यांना सहा महिन्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्याचे आदेश पारित केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर तसेच पोलीस कर्मचारी महेश मगर, शिल्पा कांबळे, रेखा पुंड आणि हेमंत झिने यांनी सहभाग घेतला.

अहिल्यानगर शहरातील गुंड प्रवृत्तीच्या इसमांविरोधात यापुढेही कठोर प्रतिबंधात्मक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# नदी, पर्यावरण संवर्धनात तरुणांचा पुढाकार व सहभाग महत्वपूर्ण ; सतेज पाटील यांचे मत

### ‘व्हाईट टी-शर्ट रिव्होल्यूशन’तर्फे नदी स्वच्छता अभियानात पुणेकरांचा उत्स्फूर्त सहभाग

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** शहरातून वाहणारी मुळा-मुठा नदी पुण्याची जीवनदायिनी आहे. मात्र, आज ती मरणासन्न अवस्थेत आहे. येणाऱ्या पिढीला स्वच्छ पाणी, शुद्ध हवा व प्रदूषणमुक्त शहर द्यायचे असेल, तर नदी, पर्यावरण संवर्धनात तरुणांचा पुढाकार महत्वाचा आहे. पुणेकरांनी लोकसभागातून आपल्या मुळा-मुठेला प्रवाहित ठेवण्यासाठी पुढे यायला हवे,“ असे मत माजी मंत्री आमदार सतेज पाटील यांनी केले.




शहरातील नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनासाठी ‘व्हाईट टी-शर्ट रिव्होल्यूशन’तर्फे आयोजित नदी स्वच्छता अभियानावेळी सतेज पाटील बोलत होते. भिडे पुलानजीक मुठा नदी पात्रात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शहरातील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, पुणेकर नागरिक मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

या स्वच्छता अभियानात माजी मंत्री यशोमती ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अभय छाजेड, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, माजी महापौर प्रशांत जगताप, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव श्रीनिवास बी. व्ही., नगरसेविका अल्पना वर्पे, प्रदेश युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष कुणाल राऊत, संयोजक व ‘व्हाईट टी-शर्ट रिव्होल्यूशन’चे प्रमुख ऋत्विक धनवट आदी उपस्थित होते.

# साध्वी प्रीतिसुधाजी म.सा.या समाजासाठी दैवी अवतार घेतलेल्या खऱ्या तपस्विनी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** भारतीय सांस्कृतिक मूल्यांचा प्रसार व भारतीय गायीचे संवर्धन यासाठी आयुष्यभर प्रवचने देणाऱ्या संस्कारभारती प्रीतिसुधाजी म.सा.या विश्वविभूती होत्या. जनकल्याणासाठी झटणारे महात्मे हेच जगाला तारणारे असतात. प.पू. प्रीतिसुधाजी म.सा.आदर्श विचारांचे बीजारोपण करणाऱ्या साध्वी होत्या,असे विचार डॉ.पांडुरंग गुंजाळ यांनी मांडले आहे.

१ मे रोजी पुणे येथे संथारा व्रतात महान साध्वी प्रीतिसुधाजी म. सा. यांचे देवलोकगमन झाले. त्यानिमित्त राहाता येथील साध्वी प्रीतिसुधाजी शैक्षणिक संकुलात वाणीभूषण प्रीतिसुधाजी म.सा

याच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमास होती. जैन श्रावक संघाचे संघपती अनिल पिपाडा, प्राचार्य ज्ञानेश डांगे, मंगलताई डांगे, भगवानराव डांगे,पत्रकार सतीश वैजापूरकर, डॉ. मधुकर देशमुख, डॉ. पांडुरंग गुंजाळ, डॉ.अशोक लोढा, समृद्धी लोढा, प्रवीण जैन, रामभाऊ लोंढे, डॉ. राजेंद्र पिपाडा आदींनी आपल्या शब्दांतून म . सा.यांना भावपूर्ण वंदना वाहिली. सूत्रसंचालन नरेंद्र मुनावत यांनी केले.



प्राचार्य ज्ञानेश डांगे यांनी सांगितले की, ’प.पू. प्रीतिसुधाजी म.सा.यांचे नाव आमच्या शैक्षणिक संकुलाला लाभणे हे आम्ही आमचे भाग्य समजतो. त्यांच्या विचारांचा गंध कायम या स्कूलमधून दरवळत असतो. म.सा.यांच्या तत्वांना गुरुस्थानी मानून स्व.डांगे सरांनी उभारलेले प्रीतिसुधाजी गुरुकुल व त्यातील उपक्रम साध्वीजींना खूप आवडायचे. २०१६ साली त्यांचा या स्कूलमध्ये झालेला चातुर्मास राहाता पंचक्रोशीसाठी भाग्यदायी घटना होती. सदविचारांतून दिशा शोधण्याचे तंत्र त्यांनी शिकविले.’

या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा स्नेहलता डांगे, उपाध्यक्ष शशीकांत डांगे,संचालिका पूनम डांगे,निवृत्त पोलीस अधिकारी मेघश्याम डांगे,शिवाजी देवढे, देवेंद्र मुनावत,संदीप वाव्हळ,शरदराव निमसे स्कूलमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी व राहाता येथील जैन श्रावक संघाचे सदस्य आदी उपस्थित होते.

# पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचाऱ्यांची विशेष सर्वसाधारण सभेची घोषणा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दि. १७ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या सभेची अधिकृत नोटीस संस्थेकडून प्रसिद्ध करण्यात आली असून सर्व सभासदांना वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सभेचे अध्यक्षस्थान संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष स्वप्नील विजय काळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे. आथवा अनुपस्थित राहिल्यास उपाध्यक्ष लक्ष्मीकांत बबनराव जाधव हे सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतील. तसेच आवश्यकतेनुसार चेअरमन जगदीश भगवान वाघ व व्हाईस चेअरमन किशोर धोंडीराम सांगळे यांच्या उपस्थितीत सभा पार पडणार आहे.

या सभेमध्ये अनेक महत्वाचे विषय मांडण्यात येणार असून त्यामध्ये अध्यक्षांची नियुक्ती, सन २०२५-२६ च्या नफ्याचे सहकार कायद्यानुसार २५ टक्के ऐवजी १० टक्के गंगाजळी वर्गीकरणाबाबत निर्णय, तसेच अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा होणार आहे. सभेच्या शेवटी आभार प्रदर्शन व सभा विसर्जन करण्यात येणार आहे.

दरम्यान, गणपूर्ती न झाल्यासही सभा नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येणार असल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

ही सभा संस्थेच्या पुढील कामकाजासाठी दिशा ठरवणारी ठरणार असून सभासदांनी उपस्थित रहावे असे आव्हान उपमुख्य कार्य अधिकारी आनंद परदेशी, व्हा चेअरमन किशोर सांगळे, चेअरमन जगदीश वाघ यांनी केले.

# स्त्रियांच्या लैंगिक शोषणाला पुरूषांचा पुरूषी दृष्टिकोन कारणीभूत

कुठल्याही स्त्री-तरुणीला विचारा; लैंगिक शोषणाचा त्यांना अनुभव नाही असं त्या म्हणणारच नाहीत; पण अशा प्रकाराकडे समाज, पोलीस, राजकारणी आणि कुटुंबातील सदस्य यांचा बघण्याचा दृष्टीकोन अतिशय असंवेदनशील असतो. बहुतेकदा स्त्रियांनाच दोषी ठरवलं जातं म्हणजे याचा अर्थ स्त्रियांनी समाजात वागायचंच नाही का ?

साऊथ दिल्लीच्या डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस शालिनी सिंग म्हणतात. स्त्रियांच्या पोशाखावर सगळे नेहमी आक्षेप घेतात. स्त्रियांचं लैंगिक शोषणाला त्यांच्या पोशाखाची स्टाईल नव्हे, तर पुरुषांचा पुरुषी दृष्टीकोन कारणीभूत असतो.

**यावर उपाय काय ?**

साहजिकच यावर उपाय काय असा प्रश्न उपस्थित होतो. महिलांविषयी आदर दाखवावा आणि त्यांना पुरुषांनी बरोबरीने समानतेने वागवावं यासाठी पुरुषांना सामाजिक प्रशिक्षण देण्याची, त्यांचा ब्रेनवॉश करण्याची गरज आहे. अशी आपण एक आदर्श कल्पना करु शकतो, पण आपण आदर्श जगात राहात नाही हे आधी समजून घेण्याची गरज आहे. मग काय करावं ?

कुठल्याही स्वरुपाचा गुन्हा घडण्यासाठी गुन्हेगार आणि गुन्हा घडण्याची संधी किंवा संभाव्य परिस्थिती आवश्यक असते. जर संधीच निर्माण होऊ दिली नाही, तर गुन्हेगार गुन्हा करायला धजावत नाही, असं साऊथ दिल्लीच्या डीसीपी शालिनी सिंग म्हणतात.

काँक्रिटच्या जंगलातील संभावित पुरुषांपासून स्वत:ला वाचवायचं टिकवून ठेवायचं असेल, तर खालील काही गोष्टी त्यांनी लक्षात घेण्याची नितांत गरज आहे.

**आत्मविश्वास दिसू द्या** : ज्या स्त्रियांच्या देहबोलीत आत्मविश्वास नसतो; कुठे जायचं आहे याबद्दल ज्या स्त्रिया संदिग्ध असतात त्यांच्यावर लैंगिक शोषण करणाऱ्या संभावित पुरुषांची नजर असते. याचसाठी अनोळखी भागात, शहरात, कामावर जाताना-येताना नेहमी आत्मविश्वाने वागायला-चालायला हवं आणि हा आत्मविश्वास ठळकपणे दिसायला हवा. अशा स्त्रियांपासून संभावित पुरूष चार हात लांब राहतात.

'सेफ्टी बॉडी' म्हणजेच सुरक्षित सोबत ही संकल्पना पाश्चिमात्य देशातील पोलीसही राबवतात म्हणजे गुन्हा घडलेल्या ठिकाणी एकट्याने न जाता ते किमान आणखी एकाला सोबत घेऊन जातात. 'सुरक्षित सोबत याचा अर्थ कायम तुमच्या सोबतीला कोणी असावं असा नाही. तुम्ही प्रवासात आहात, कुठे आणि किती वेळात पोहोचणार आहात, हे एखाद्या व्यक्तीला तरी ठाऊक असावं. टॅक्सी ड्रायव्हर किंवा ऑटो रिक्षा ड्रायव्हरलाही याची जाणीव व्हावी याप्रकारे संभाषण करावं. आजकाल नोकरदार स्त्रियांना रात्री उशिरा कंपनीच्या गाडीतून घरी सोडलं जातं. अशावेळी एखाद्या विश्वासू सहकाऱ्याची सोबत घ्यावी किंवा मोबाईलवरून घरच्यांशी प्रवासात सतत संपर्कात राहावं आणि रिक्षा-टॅक्सीचा नंबर टिपण्याची सवय ठेवावी.'



**सतत सावध रहा**

आपण कुठे आहोत याकडे लक्ष न देता मोबाईलवर किंवा म्युझिक ऐकणाऱ्या स्त्रिया तरूणी आपण बघतो. ही सवय धोकादायक ठरू शकते. दिल्लीची सिम्मी कोहली ही तरूणी दिल्लीच्या एका अपरिचित भागातून जात असताना एका मोटारसायकल स्वाराने तिच्या हातातला मोबाईल हिसकावून पळ काढला. चिडलेल्या सिम्मीने एका स्कूटरवाल्याची मदत घेऊन पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, पण त्या स्कूटर चालवणाऱ्याला सिम्मीची मदत करण्याऐवजी दुसरचं हवं होतं. यासाठी आपण कुठे आहोत, कुठे जातोय याबाबतीत स्त्रियांनी अखंड सावध रहावं.

**जोखीम टाळा ; कमी करा**

रात्री उशिरा पार्टी, मित्रांशी गप्पा, ट्रॅव्हल ही आजची जीवनशैलीच बनलेली आहे; पण तरीही काही गोष्टी लक्षात ठेवणं गरजेचं आहे. गुन्हेगारांना काळोख्या जागा, कोपरे आवडतात. कारण गुन्हा करुन त्यांना पळण्याची संधी असते. ज्यावेळी पकडले जाण्याची शक्यता नसते त्यावेळी ते हल्ला करतात. शक्यतो अशा जागा टाळून लोकांचा वावर असणाऱ्या आणि भरपूर प्रकाश असणाऱ्या ठिकाणांची निवड करावी. रात्रीचे कार्यक्रम टाळता येणं शक्यच नसेल, तर पूर्ण काळजी घ्यावी.

**पार्टी स्मार्ट बना**

पाटी एन्जॉय करणं ही तरुणाईची स्टाईल आहे. मुंबईत घडलेल्या अलिकडच्या काही घटना बघितल्या तर श्रीमंत आणि सुशिक्षित वर्गातील, तरुणांकडून गँगरेपच्या घटना घडलेल्या आहेत. पार्टीत आजकाल ड्रिंक्स सहजतेने सर्व्ह केलं जातं म्हणूनच त्याबद्दल सावध राहणं गरजेचं आहे.

पार्टीत ओळखीच्या ग्रुपमध्येच शक्यतो राहावं आणि ज्यावर फारसा विश्वास नसेल; नवी ओळख झाली असेल त्या व्यक्तीने कितीही आग्रह केला, तरी ड्रिंक्स घेऊ नका. किंवा स्वत:च्या सवयींबद्दल काही बोलू नका.

**प्रतिक्रिया द्या, प्रतिकार करा**

एखादी व्यक्ती त्रास देत असेल, तर स्त्रिया एकदम त्याचा प्रतिकार करत नाहीत किंवा तमाशा करत नाहीत. एक-दोन वेळा दुर्लक्ष करणं ठीक आहे; पण त्रास देणाऱ्या पुरुषाचं धाडस वाढत असेल, तर त्याबद्दल चार-चौघात जाब विचारा.

घाबरु नका. अपराधीपणाची भावना बाळगू नका. स्त्रियांचं शोषण करणाऱ्या संभावित पुरुषांना जाहीर विरोध केला की ते आपोआपच गप्प बसतात. असे अनेक नियम आहेत. फार फॅशनेबल राहू नका.

अनोळखी व्यक्तीसोबतचं नेट सर्फिंग, चॅटिंग टाळा, कायम सुरक्षित प्रवास करा. त्रास देणाऱ्या पुरुषांचा सामना करा, धाडस दाखवा... खूप काही सांगता येईल, पण खरी गरज आहे स्वत्व सांभाळून आत्मसन्मान सांभाळून निर्भयतेने स्त्रियांनी जगण्याची खरी गरज आहे.

# मागितल्याशिवाय कोणालाही सल्ला व मत देऊ नका

आपले छोटेसे जीवन आनंदात जावे अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. जीवनात आपल्यावर कोणतेही संकट येऊ नये, समस्या निर्माण होऊ नयेत असेही आपल्याला वाटते. आपण जर खालील सल्ल्यानुसार चाललात, तर आपल्या या इच्छा सफल होतील -



* स्वत:ला सर्वगुणसंपन्न समजण्याची चूक कधीही करू नका. काही ना काही शिकण्यासाठी हे आयुष्यही कमी आहे.
* गरजेविना नाहक वस्तूंचा संग्रह करू नका. मनावर ताबा ठेवून शॉपिंग करा. त्यामुध्ये पैसा व वेळ नाहक वाया जातो.
* एखाद्याच्या चुकीची चेष्टा करू नका. उद्या आपल्यावरही तशी वेळ ओढवू शकते.
* मिळालेल्या संपत्तीचा व सौंदर्याचा गर्व करू नका. त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाची सौम्यता व शोभा वाढवण्याऐवजी घटते.
* स्वत:ला निराधार व अक्षम मानून दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याचा विचार करू नका. कोणतेही काम अशक्य नसते, या विचारानेच ध्येयाकडे जात राहा.
* जीवन लाभले आहे म्हणजे सरेलही असा विचार करून ते नाहक दवडू नका. असे काही करून दाखवा की, आपण गेल्यानंतरही आपली स्मृती राहील व खऱ्या अर्थाने जीवनाचे सार्थक होईल.
* इतरांनी केलेल्या कामांत दोषच दोष दाखवू नका. प्रत्येक व्यक्तीत चांगले गुणही असतात, असाच विचार करा.
* घाईगडबडीत कोणताही निर्णय घेऊ नका. प्रथम विचार करा. समजून घ्या, नंतरच कृती करा.
* जीवनात कशीही वेळ आली, तरी उधारीची अपेक्षा बाळगू नका. क्षमतेनुसारच खर्च करा.
* आपल्या मुलांची इतर मुलांशी तुलना करू नका. त्यामुळे त्यांच्यामध्ये हीनभावना वाढेल.
* मागितल्याशिवाय कोणालाही सल्ला वा मत देऊ नका. यामुळे आपला मोठेपणा व आपल्या विषयीचा जिव्हाळा टिकून राहील.
* शक्यतो कोणताही तणाव न राखण्याचा प्रयत्न करा. जे आपल्या हाती आहे ते सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थैर्य आणण्याचा विचार करा.

# दिखाव्याला बळी पडू नका

आजच्या धावपळीच्या जगात जो तो 'परफेक्ट' बनण्याचा प्रयत्न करीत असताना आपला आत्मविश्वास कसा वाढेल, याकडे लक्ष देतो. विश्वास ही एक अशी चावी आहे, जिचा वापर केल्याने आपल्या प्रगतीची कवाडे चुटकीसरशी खुली होऊ शकतात. पण ते म्हणतात ना की, अल्लाउद्दीनचा दिवा मिळाला तर जीवनच बदलून जाते. पण तो कुठे मिळतच नाही. अगदी याचप्रमाणे आत्मविश्वासदेखील प्रत्येकाकडे असतोच असे नाही. तो प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग ठरतोय असे नाही. याच कारणास्तव एक चांगला बुद्धिमान मनुष्य पात्रता असूनही तिथंपर्यंत पोहोचू शकत नाही जिथंपर्यंत त्याने पोहोचायला हवे होते. आपल्या व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास असेल, तर एक चांगली पोस्ट आपल्या हातून कुठेच गेली नाही, हे नक्की समजा !

0 ''आपण स्मार्ट किंवा गुडलुकिंग नाही त्याचं काय ?'' हा विचार आपल्या डोक्यातून सर्वांत पहिल्यांदा काढून टाका. गुडलुकिंग नसल्याने आपण कॉन्फिडन्ट होऊ शकत नाही, हा आपला गैरसमज आहे. स्मार्टनेसमुळे आत्मविश्वास वाढतो हे नक्की; मात्र आपले विचार चांगले असतील, तर आपणही 'कॉन्फिडन्ट पर्सनॅलिटी' बनू शकता.

0 आपले विचार हे नेहमी सकारात्मकतेला धरून असावेत. आपल्या डायरीच्या पानांवर आपल्या चुका वा स्वतःबद्दल वाईट-साईट लिहिण्यापेक्षा आपल्या हातून घडलेल्या चांगल्या कामांची नोंद करा.

0 योग्य दिशा आणि सकारात्मक विचार बाळगणाऱ्या लोकांसोबत मैत्री करा.

0 आरशासमोर उभे राहून स्वतःशी संवाद साधा. यावरून, आपण किती कॉन्फिडण्ट आहोत, याची आपली आपल्यालाच ओळख होईल.

0 दिखाव्याला बळी पडू नका. आपल्याकडील बुद्धि-चातुर्याचा वापर करा. या वाक्याला आपल्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान द्या.

0 उत्तम विचार राखणाऱ्या लोकांशी संवाद साधा. त्यांच्या संपर्कात राहा. त्यांचे बोलणे, अनुभव ऐकून-ऐकून इतरांशी संवाद साधण्याबाबतचा आत्मविश्वास तुमच्यातही जागृत होईल.

0 मनुष्य करू शकत नाही, असे कुठलेच काम नाही. चंद्रावर पाऊल ठेवण्यापासून ते दरीखोऱ्यांत घर बांधण्यापर्यंतची अवघड कामं या मनुष्यानेच करून दाखवली आहेत. तुम्हीही मनात आणलंत, तर काहीही करू शकतात. फक्त कॉन्फिडण्ड.



# नोकरदार पुरुषाला घरात पती आणि कार्यालयात कर्मचारी अशा दोन भूमिकात वावरावे लागते

कर्मचारी असलेले एकजात सारे पुरुष आपापल्या बॉसला अर्थातच मनातल्या मनात शिव्या घालत असतात. 'बॉस' नावाच्या प्राण्यामुळेच आपला ब्लडप्रेशर वारंवार वाढतो, असे बहुतेक पुरुषांना प्रामाणिकपणे वाटत असते, परंतु त्यांचा हा समज चुकीचा आहे. बॉसमुळे नव्हे तर बायकोमुळे पुरुषांचा ब्लडप्रेशर जास्त वाढतो, असा निष्कर्ष ब्रिटनमधील ताज्या सर्वेक्षणातून निघाला आहे.

नोकरदार पुरुषांना घरात पती आणि कार्यालयात कर्मचारी अशा दोन भूमिकात वावरावे लागते. घरात बायकोला तर कार्यालयात बॉसला तोंड द्यावे लागते आणि या दोन्ही ठिकाणच्या संघर्षामुळे पुरुषांवर मानसिक तणाव येत असतो.

मानसिक तणाव आला की. ब्लडप्रेशर स्वाभाविकपणे वाढतो. बॉसमुळे बीपी जास्त वाढतो की बायकोमुळे ब्रिटनमधील या सर्वेक्षणात ३० ते ६० वर्षे वयोगटातील सुमारे तीन हजार विवाहित पुरुषांना हा प्रश्न विचारण्यात आला बॉसमुळेच जास्त टेन्शन आणि बीपी वाढतो, असे सुरुवातीला आपल्याला वाटत होते, परंतु प्रत्यक्षात बायको 'गनिमी काव्या' जास्त टेन्शन व बीपी वाढवत आहे, असे अनुभवातून आता निष्पन्न झाले आहे, असे उत्तर ८५ टक्के पुरुषांनी दिले.

घर आणि कार्यालय यापैकी एकही ठिकाण पुरुषांना पूर्णपणे तणावमुक्तता लाभेल, पण तरीही घराच्या तुलनेने कार्यालयात पुरुषांना जास्त तणावमुक्तता लाभेल, असेही या संशोधन सर्वेक्षणातून निष्पन्न झाले आहे.

दुसरीकडे बायकोमुळे नव्हे तर बॉसमुळे आपले टेन्शन आणि बीसी जास्त वाढला, असे ४३ टक्के पुरुषांनी म्हटले आहे. 'फिलिब्स' या इलेक्ट्रॉनिक आणि आरोग्य सेवा क्षेत्रातील कंपनीने हे सर्वेक्षण केले आहे.

बायकोमुळेही नव्हे तर बॉसमुळेही नव्हे तर भवितव्याविषयी अतिचिंता केल्यामुळे आपले टेन्शन आणि बीपी जास्त वाढतो, असे १२ टक्के पुरुषांनी म्हटले आहे.

## सुगरणीचा सल्ला

...तीने ढोकळा बनवून तो उलटल्यावर ... त्यावर फिरवावा. म्हणजे कोंडलेली वाफ ... जाळीदार बनतो.

◆ ... करतानासारण व फोडणी वेगवेगळी न करता, नारळाचा खव, मीठ, वाटलेली मिरची, कोथिंबीर, साखर एकत्र करून त्यातच थोडी फोडणी गार करून घालावी. सारण ताटाच्या अर्ध्या भागापर्यंत पसरावे, म्हणजे वडी जास्त जाड होत नाही व वडी जास्त चांगल्या प्रकारे गुंडाळली जाते. यात तेलाची बचत होते ते वाया जात नाही.

◆ भज्याचे पीठ पाण्यात कालवण्यापूर्वीच त्यात खूप फेसून तेल घालावे. हळदी ऐवजी खाण्याचा पिवळा रंग चिमूटभर घातल्यास भज्यांना रंग छान येतो. फेसून मोहन घातल्यामुळे भजी खुशखुशीत होतात. बटाटेवड्याच्या पिठाला हीच कृती करावी.

◆इडली रव्याचे एक पाकीट घ्यावे. त्यातील रवा सांजा करतो त्याप्रमाणे भाजून घ्यावा व नंतर नेहमीप्रमाणे फोडणी करून, त्यात रवा, कढीलिंब, उडदाची डाळ किंवा मूगडाळ घालून जरूरीप्रमाणे तिखट-मीठ पाणी घालावे व चांगली वाफ आणावी म्हणजे उप्पीट तयार.

◆पेपर डोशाचे मिश्रण मिक्सरमधून काढताना त्यात एक मध्यम आकाराचा कांदा चिरून टाकावा व अर्धी वाटी दुधामध्ये थोडे बेसन कालवून त्यात मिसळावे व पीठ आंबवण्यास ठेवावे. याने डोसा एकदम पातळ व कुरकुरीत होतो. तव्याला अजिबात चिकटत नाही.

◆दूध व मलई विरजलेले ताक केल्यानंतर लोण्याचा गोळा काढल्यावर ताकात प्रथिने, कर्बोदके व जीवनसत्वे, व क्षार राहतात. ताक गाळल्यावर गाळणीतला चोथा पोळ्या करताना पिठात मिसळावा. पोळ्या खुसखुशीत व चवदार होतात. शिवाय नेहमीचे मोहन पिठात घालावे लागत नाही. चोथ्याबरोबर हिरवी व कोथिंबीर चिरून घातल्यास लज्जतदार पराठे करता येतात.

■■■

# आधुनिक पुरुष प्रेमात पडून लग्न करतात, मात्र संसाराची कटकट नको असते



हळव्या भावुक प्रेमाची टर उडविणारी पिढी वैवाहिक जीवनात यशस्वी होत नाही, याचं कारण एकच. या पिढीला जबाबदारी मान्य नाही. प्रेमामध्ये 'सेक्स' चा भाग असतो. तसाच जबाबदारीचा असतो; पण स्वार्थत्यागाला ही पिढी बुळेपणा समजते. प्रेमात पडून लग्न करते, मात्र संसाराची रिॲलिटी तिला झेपत नाही. संसारात कामाची वाटणी करण्याची वेळ आली की, पुरुषाचा अहंकार फणा काढतो आणि मग वर्षा-दोन वर्षात हे जोडपं घटस्फोटासाठी न्यायालयात जातं ! नव्या पिढीला सगळं काही झटपट हवं असतं. रेडी टू कुक इन्स्टन्ट फूडप्रमाणेच प्रेमदेखील थोड्याशाच ओळखीत बेडरुममध्ये नेण्याची तिला घाई असते. अनेक तरुणांना एकाच तरुणीशी मैत्री आणि शारीरिक संबंध हवे असतात; पण लग्न नको असतं. एकत्र राहाणं नको असतं, असा विचित्र अनुभव स्त्रियांना येतो आहे. एकत्र राहण्यामुळे निर्माण होणारी जबाबदारीची कटकट पुरुषांना अजिबाद नको आहे.

प्रेमामुळे आणि नंतर त्यातून जुळणाऱ्या विवाहबंधनामुळे स्त्री-पुरुषांना स्थैर्य मिळावं अशी अपेक्षा असते; पण या काळातले प्रेमिक अत्यंत अधीर आणि असुरक्षित आहेत. जोडीदारानं फोन उचलायला दहा मिनिटं उशीर केला, तर तो दुसऱ्या कुणाबरोबर तरी असेल का, अशी शंका या जमान्यातल्या लैला-मजनूना येते. आपण लड्डु झालोय की काय ? त्यामुळे तो दुसऱ्या स्त्रीकडे आकर्षित झाला आहे की काय ?

मानसतज्ज्ञ डॉ. शैलेज सरकार म्हणतात, 'आजकालच्या रेमिओ-ज्युलिएटना एकमेकांबद्दल तर विश्वास नसतो; पण स्वत:बद्दलही विश्वास नसतो. म्हणूनच त्यांची मैत्री/प्रेम लग्न फार काळ टिकत नाही, एमटीव्ही जनरेशन बिंदास असल्याचा आव आणते; पण मनातून ती सदैव अस्थिर साशंक असते. एकमेकांना स्वातंत्र्य देण्याच्या गप्पा ते करतात, पण प्रत्यक्षात ते एकमेकांवर सतत पाळत ठेवतात. युटीव्ही बिंदास चॅनेलचे बिझनेस हेड निखिल गांधी म्हणतात, तरुणांसाठी कार्यक्रम तयार करताना आम्ही लेखक, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ या सर्वांशी सतत संपर्कात असतो.

त्यांच्याकडून सर्व्हे करुन घेत असतो. अलीकडे आम्ही घेतलेल्या सर्व्हेमध्ये असं आढळलंय की, तरुण पिढीतल्या प्रेमिकांना काय आहे, प्रेमाच्या आदर्श स्थितीचा विचार करायला ते तयार नाहीत. तो करुन परस्परांशी तडजोड करण्यापेक्षा त्यांना घटस्फोट घेणं बरं वाटतं! स्प्लिट्सव्हिल आणि रोडीज या रिॲलिटी शोजची संकल्पना ज्यांची होती, ते रघू राम रोखठोक सांगतात. कुणाला आवाडो की नावडो, पण प्रेम ही मुळीच नि:स्वार्थ गोष्ट नाही. तसं नसतं तर मत्सर आणि संशय अस्थैर्य आणि मालकी हक्काची भावना या गोष्टी त्यात आढळल्याच नसत्या. मनुष्यजातीच्या जन्मापासून या गोष्टींचा आणि प्रेमाचा अतूट संबंध आहे. एकाच व्यक्तीवर जन्मभर प्रेम ही तर अशक्य गोष्ट आहे. खऱ्या प्रेमातसुद्धा माणसाच्या भावना बदलू शकतात.

म्हणून तर माणूस आपल्या प्रेमाच्या माणसाची हत्या करायला मागेपुढे बघत नाही. या काळातला माणूस प्रेमामध्ये सेक्स आणि पैसा यांना जास्त महत्व देतो. श्रीमंत पुरुषानं/स्त्रीनं गरीब जोडीदार निवडण्याचे दिवस संपले ! आताचे प्रेमिक एकमेकांची आर्थिक स्थिती सम दर्जाची असली, तरच लग्न करतात ! मानसशास्त्रज्ञांच्या मते, नव्या पिढीचा स्वभाव दुहेरी आहे. ती सिद्धिविनायकाचं मनोभावे दर्शन घेते आणि मंदिरातून बाहेर पडताच बिअर पिते!

तिला प्रेमात सतत नावीन्य हवं असतं. थरार हवं असतं. त्यासाठी ती सतत प्रयोग करीत असते ! आणि प्रयोग म्हटलं की अपघात आलेच! बहुतेकदा त्याचं प्रेम हा अपघातच असतो. म्हणून तर त्या कधी स्फोट तर कधी घटस्फोट होणं अटळ असतं.

# आपले ड्रेसिंग टेबल कसे ठेवाल

घाई गडबडीत आपण साजशृंगारासाठी बसता आणि आपला हिरमोड होतो.

कारण आपला आरसा एवढा धूसर झालेला असतो की त्यात आपली प्रतिमाच दिसत नाही. जसे आपण आपल्या सौंदर्यासाठी जागरूक असता तसेच आपल्या शृंगाराची जागा (रूम असो वा टेबल) ही सुंदर राखायला हवी. यासाठी खालील दक्षता घ्या.



* ड्रेसिंग टेबलावर मेकअपचे सामान व्यवस्थित सजवून ठेवा.
* लिपस्टिक, नेलपॉलिश स्टॅण्डमध्ये ठेवलेल्या लहान सहान वस्तू उदा. पिना, बकल इ. आकर्षक बॉक्समध्ये ठेवा.
* परफ्यूम, टाल्कम पावडर ही टेबलावर सजवा पण ड्रेसिंग टेबलावर फालतू वस्तू जमवू नका. बऱ्याचदा ड्रेसिंग टेबलावर मेकअपशिवाय इतर सामानच पडलेले असते.
* ड्रेसिंग टेबलाची काच रोज व्यवस्थित साफ करा. यासाठी वृत्तपत्राचा कागद उत्तम असतो.
* ड्रेसिंग रूममध्ये योग्य प्रकाश व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे असते. शक्य असल्यास आरशावर ट्युबलाईट लावून घ्या. त्यामुळे आपल्याला मेकअप करणे सुलभ होईल.
* ड्रेसिंग रूममध्ये हेअर ड्रायर, मसाजर व इतर उपकरणांचा वापर करण्यासाठी निरनिराळ्या जागी स्विच बोर्ड व प्लग असावेत.
* वॉर्डरोबमधील आपले कपडेही व्यवस्थित लावून ठेवा. साड्या हँगरवर लावून वॉर्डरोबमध्ये लटकावा.
* एक्सपायरी डेट झालेली सौंदर्यप्रसाधने काढून फेकून द्या. बऱ्याच महिलांना बिंदी काढून आरशावर चिकटवण्याची सवय असते. त्यामुळे आरसा खराब होतो. बिंदी काढून बिंदीच्या पाकिटातच चिकटवावी.
* ड्रेसिंग टेबलावरील कंगवे, ब्रश साफ ठेवावेत.

## स्टीम कबाब

**साहित्य** : एक किलो रताळे, राजगिऱ्याचे पीठ एक किलो, एक किलो रिफाइंड सोयाबिन तेल, अर्धा किलो साखर, विलायची २० ग्रॅम, खोबरे शंभर ग्रॅम, काजू शंभर ग्रॅम.


**पूर्वतयारी** : रताळे गरम पाण्यात उकळून घ्यावे, उकळलेल्या रताळ्याची साल काढावी व कुस्करून घ्यावे, काजु बारीक करावा, विलायची बारीक करायची, खोबरे किसून घ्यायचे, साखर मिक्सर मधून काढून घ्यायची.

**कृती** : कुस्करलेल्या रताळ्याच्या मिश्रणात खोबरा किस, काजु व विलायची टाकायची. चांगल्या प्रतिच्या राजगिऱ्याचे

पीठ मिसळून मिश्रण चांगले तिंबून घ्यावे. गॅसवर कढई ठेवायची. पोळपाटावर मिश्रणाच्या छोट्या पुऱ्या लाटायला सुरूवात करायची. तेल तळण काढण्या जोगते तापल्या नंतर तेलात हळूच पुरी सोडायची. तांबुस रंग येईपर्यत पुरी तळायची. तळल्या गेलेली पुरी झाऱ्याच्या साह्यने अलगद काढायची. पुरया वेताच्या टोपलीत कागद टाकून ठेवायच्या.

# हसण्याचे ५ फायदे जाणून घ्या...

आजच्या धावपळीच्या जीवनात कामाच्या दबावाखाली आम्ही विसरूनच जातो की आम्ही मनसोक्त केव्हा हसलो होतो. जेव्हाकी हसणे आम्हा सर्वांसाठी फारच महत्त्वाचे आहे, तरी ही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. हसण्याने आपले आयुष्य निरोगी आणि आनंदी राहत. म्हणून हसण्याच्या पाच फायद्यांबद्दल जाणून घेऊया.



१. हसण्याने हृदयाचा व्यायाम होतो. रक्त प्रवाह देखील चांगल्या प्रकारे होतो. हसताना, शरीरातून रासायनिक द्रव्य एंडॉर्फिन सोडले जाते. आणि हे द्रव्य आपल्या हृदयाला मजबूत बनवते. हसण्यामुळे हृदयविकाराची शक्यता कमी होते.

२. एका संशोधनानुसार, ऑक्सिजनच्या उपस्थितीत, कर्करोगाच्या पेशी आणि अनेक प्रकारचे हानिकारक जिवाणू आणि व्हायरस नष्ट होतात. हसण्याने आपल्याला अतिरिक्त ऑक्सिजन उपलब्ध होते आणि शरीराची रोगप्रतिकार शक्ती खूप मजबूत होते.

३. सकाळी जर हास्य ध्यान योग केले तर दिवसभर आपण आनंदी राहतो. जर रात्रीच्या वेळी केले तर आपल्याला चांगली झोप लागते. हास्य योगामुळे आपल्या शरीरात अनेक प्रकारच्या हार्मोन्सचा स्राव होतो, ज्यामुळे मधुमेह, पाठीचे दुखणे आणि तणावग्रस्त व्यक्तींना आराम मिळतो.

४. हसण्यामुळे सकारात्मक ऊर्जा देखील वाढते. सकाळी आनंदी राहण्याने ऑफिसचे वातावरण देखील आनंददायी होत. म्हणून मित्रांनो, आपण सर्वजण दोन किंवा चार चुटकुले वाचून आपल्या दिवसाची सुरुवात हसून करावी.

५. दररोज एक तास हसण्याने ४०० कॅलरीज ऊर्जाचा वापर होतो, ज्यामुळे लठ्ठपणा देखील नियंत्रणात राहतो. आजकाल बरेच हास्यक्लब देखील तणावपूर्ण जीवनात हसण्याच्या माध्यमाने दूर करण्याचे काम करत आहे.

■■■

# मुलांच्या पॉकेट मनीबद्दल पालकांनी जागृत रहावं

तरुणाईच्या जीवनशैलीमध्ये कमालीचा फरक पडला आहे. काळाच्या ओघात तरुणाईच्या गरजाही वाढल्या आहेत. मित्र-मैत्रिणींबरोबर होणारी पार्टी, पिकनिक, सिनेमा, कपडे खरेदी अशा किती तरी प्रकारच्या मौजमजेसाठी बक्कळ पैसे खर्च होतात. महाविद्यालयीन जीवनात स्वत:चे कोणतेही उत्पन्न सुरू नसल्याने या खर्चासाठी आई-वडिलांकडून पैसे घेतले जातात. पॉकेटमनीच्या रुपात तरुणाईला मिळणारी ही रक्कम कुठे आणि कधी खर्च होते याचं गणित त्यांचं त्यांनाही मांडता येत नाही. पूर्वीही तरुणांना घरातून पॉकेटमनी मिळत होता. परंतु, ती रक्कम अतिशय नगण्य होती. सध्याच्या तरुणांचा पॉकेटमनी मात्र पूर्वीच्या लोकांच्या पगाराएवढा असतो.

मोबाईल बाळगणारी ही पिढी पाहिली की वाटतं यांचा पॉकेटमनी काय असेल ? मोबाईलचं बिल कदाचित पिताश्री किंवा मातोश्री भरत असतील. पण तरी त्यांचा महिन्याचा खर्च किती असेल ? कॉलेजच्या आसपासच्या रेस्टॉरंट, कॉफी शॉप्समध्ये नुसती नजर टाकली तरी युवक-युवतींचे कंपू निवांतपणे गप्पा मारत बसलेले दिसतात. सर्वांनाच एवढा खर्च परवडत असेल का ? याबद्दल त्यातल्याच काही मित्र-मैत्रिणींशी बोलून माहिती घेतली. महाविद्यालयीन युवक-युवतींपैकी बरेचजण निश्चितच विचार करून खर्च करतात हे यामध्ये जाणवलं.

मनिषाला महिन्याला साधारणपणे पाचशे ते सहाशे रूपये पॉकेटमनी लागतो. यामध्ये तिचं बसचं भाडं, हॉटेलमधलं खाणं असे खर्च भागतात. कपडे किंवा इतर वह्या पुस्तकांवरचा खर्च आई-वडील तिला स्वतंत्रपणे देतात. घरची परिस्थिती माहित असल्यामुळे ती मिळणाऱ्या पॉकेटमनीत समाधानी आहे. तिच्याच वर्गात असलेली समिक्षा हे एक बडं प्रस्थ आहे. ती चारचाकी गाडीतूनच कॉलेजला येते. त्यामुळे तिच्या इमेजबद्दल विचारायलाच नको. घरच्या उत्तम आर्थिक परिस्थितीमुळे खर्चाच्या बाबतीत ती कधीच हात आखडता घेत नाही. पर्समध्ये कधीही हजार-दोन हजार रूपये सहज असतात. यामुळेच हॉटेलिंग, सिनेमा, शॉपिंग यामुळे तिच्याभोवती नेहमीच मित्र-मैत्रिणींचा घोळका असतो. हातात पैसे असले आणि खर्चही होत असला तरी समिक्षा त्याचा व्यवस्थित हिशेब ठेवते. पैसे आहेत म्हणून 'ऐश' करायची असं तिचं मत असलं तरीही कुणी आपल्याला पैशांबाबत फसवू नये म्हणून ती रोजचा हिशेब व्यवस्थित लिहिते. महिन्याकाठी तिचा पाच ते सहा हजार रूपयांचा खर्च होतो. यामध्ये तीन ते चार हजार फक्त हॉटेलिंगवर खर्च होतात.

राजूचा महिन्याचा खर्च किती आहे याचा त्याला अंदाजच येत नाही. पैसे संपले की मम्माकडे मागायचे एवढंच त्याला माहित आहे. त्यामुळे सिनेमा, हॉटेलिंग यावर त्याचा भरपूर खर्च होतो. त्याच्या आई-वडिलांचा स्वत:चा व्यवसाय आहे. त्यामुळे त्याला नोकरी शोधण्याचीही गरज नाही. पदवी मिळाली की वडिलांना व्यवसायाला हातभार लावणार हे ठरलेलं आहे. त्याचाही सर्वात जास्त खर्च हॉटेलिंगवर होतो. मोबाईलचं बिलही आई-वडील भरतात. फॅशनेबल कपडे, शॉपिंग, सिनेमा यावरचा खर्च वेगळाच !

विनायकची गोष्टच वेगळी आहे. तो शिक्षणासाठी वसतिगृहात राहतो. त्यामुळे तिथला राहण्या-जेवण्याचा खर्चच त्याला जास्त वाटतो. घरची परिस्थिती मध्यमवर्गीय असल्यामुळे फॅशनेबल कपड्यांसारखा अनावश्यक खर्च तो टाळतो. तरीही साधारणत: दोनशे रूपये तो हॉटेलिंगवर किंवा सिनेमावर खर्च करतो. त्याचेच दोन मित्र मध्यमवर्गातून आलेले आहेत. त्यांना शिक्षण घेण्याची संधी मिळत आहे हीच महत्त्वाची गोष्ट वाटते. त्यामुळे शिक्षणाव्यतिरिक्त खर्च करण्याची त्यांची परिस्थितीही नाही आणि इच्छाही नाही.

राहुल आणि सचिन हे दोघंजण कॉलेज सांभाळून नोकरी करतात. त्यामुळे स्वत:च्या कमाईचा एक वेगळाच आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो. त्यांच्या घरची परिस्थिती चांगली आहे. तरीही संधी मिळाल्यामुळे त्यांनी अनुभवासाठी नोकरी स्वीकारली आहे. नोकरीमुळे पैशाचं महत्त्व लक्षात येतं आणि खर्चावर नियंत्रण राहतं असं त्याचं मत आहे. त्यांचाही हॉटेलिंगवर प्रत्येकी एक हजार रूपयांपर्यंत खर्च होतो. एकूणच कॉलेज जीवनामध्ये सर्वात जास्त खर्च होतो तो हॉटेलिंगवरच. याबद्दल विचारलं असता काही जणांनी सांगितलं की गप्पा मारायला इकडे तिकडे भटकण्यापेक्षा एखाद्या कॉफी शॉपमध्ये बसणं सर्वांना सोयीचं वाटतं. मग कॉफीबरोबर काहीतरी स्नॅक्स मागवले जातात. कधी कधी टीटीएमएम (तुझं-तू-माझं-मी) बिल भरतो पण बरेचदा बिल कुणाच्या तरी एकाच्या गळ्यात मारलं जातं. त्यातच एखाद्या मुलीवर इंप्रेशन मारायचं असेल तर हॉटेलवर खर्च करण्याशिवाय पर्यायच नसतो. आधी तिच्यावर इंप्रेशन मारायलाच बराच खर्च होतो मग ती पटली तर नंतरच्या खर्चाचं काही विचारायलाच नको. युवक-युवतींच्या या खर्चाबद्दल पालकांचं काय मत असतं असं विचारताच सर्वांनी एकमुखानं सांगितलं की आई-वडील एक-दोनदा खर्चाबद्दल सुनावतात पण आम्ही सांभाळून घेतो आणि त्यांना पटवतो. हल्ली सर्वच मुलांचा एवढा खर्च असतो हे त्यांना सांगतो. त्यामुळे आम्हालाही थोडं पुढे मागे करून हवी ती रक्कम मिळते. शिवाय आम्ही आमचंही वेगळं सेव्हिंग करतो ते उपयोगी पडतं.

हेच लाईफ एन्जॉय करण्याचे दिवस आहेत मग नंतर आहेच नोकरीसाठी वणवण आणि रोजचा जमाखर्च. सध्या तरी काही चिंता नाही, आम्ही काही कर्ज काढून ऐश करत नाही. जेवढे पैसे मिळतात त्यातच जमेल तशी मौजमजा करतो. या सर्वांशी बोलल्यावर जाणवलं ते म्हणजे आजच्या पिढीला खर्चाची जाण आहे पण तो कमी करण्याची तयारी नाही. सर्वजण असाच खूप खर्च करतात म्हणून आम्हीही करणार असं त्यांचं म्हणणं आहे. अर्थात आई-वडिलांना झेपेल एवढाच खर्च ते करतात हे खरं असलं तरी आई-वडिलांनी दिलेले पैसे जास्त आहेत म्हणून शिल्लक राहिलेले पैसे परत देणारा एकही भेटला नाही हेही तितकंच खरं !

# वेळीच सावध व्हा! 'या' दोन भाज्या कच्च्या खाल्ल्याने किडनी पूर्ण निकामी होऊ शकते

किडनीचे म्हणजेच मूत्रपिंडाचे वेगवेगळे आजार होण्याचे प्रमाण आता वाढले आहे. हृदयरोगाप्रमाणेच कमी वयातच किडन्यांचे आजारही वाढत आहेत. किडनी हा शरीरातील एक लहानसा अवयव होय; पण तो आपल्या शरीर आणि आरोग्यासाठी खूप महत्त्वाचा असतो. किडनी निकामी होण्याची समस्या गेल्या काही वर्षांत अधिक दिसून येत आहे. किडनीचा आजार जितका धोकादायक आहे, तितकाच हा आजार उशिरा ओळखला जातो, त्यामुळे किडनीची थोडीशी समस्यादेखील किडनी पूर्णपणे खराब होण्याचे कारण बनते. भारतात किडनीचे आजार असलेल्या रुग्णांची संख्या झपाट्यानं वाढत आहे. चुकीच्या आहाराच्या सवयींमुळे किडनीच्या आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. पोषणतज्ज्ञ आणि आरोग्य प्रशिक्षक करिश्मा शाह यांनी किडनी स्टोनचा त्रास वाढण्यासाठी दोन भाज्या मुख्य कारण ठरू शकतात, याविषयी माहिती दिली आहे, त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ

करिश्मा शाह सांगतात, शरीरामध्ये खनिजे आणि क्षार पदार्थ यांची मात्रा वाढल्यास शरीरामध्ये किडनी स्टोन तयार होऊ लागतो. किडनी स्टोन ही एक फार असह्य वेदना देणारी आणि कुणालाही होणारी समस्या आहे. किडनीमध्ये स्टोन कॅल्शिअम ऑक्सालेटमुळे तयार होतात. लघवीमध्ये जेव्हा कॅल्शिअम आणि ऑक्सालेट दोन्हींचं प्रमाण अधिक वाढतं, तेव्हा दोन्ही गोष्टी एकत्र जमा होतात आणि छोटे छोटे स्टोन तयार होतात. चुकीच्या खाण्या-पिण्याच्या सवयी आणि चुकीच्या लाइफस्टाईलमुळे किडनी स्टोनची समस्या होते. भरपूर पाणी पिण्यासोबतच तुम्हाला खाण्या-पिण्याकडेही नीट लक्ष दिले पाहिजे. दररोज खाल्ले जाणारे काही पदार्थ हे किडनी स्टोनचा त्रास वाढवू शकतात. एवढेच नव्हे तर तुम्ही या पदार्थांचे अतिप्रमाणात सेवन केले तर किडनी स्टोन होण्याचा धोका वाढतो.

करिश्मा शाह यांच्या माहितीनुसार, किडनी स्टोनचा त्रास वाढण्यासाठी दोन भाज्या मुख्य कारण ठरू शकतात, त्यामुळे या भाज्या चुकूनही कच्च्या खाऊ नये; त्यामुळे कालांतराने किडनी पूर्ण निकामी होण्याचासुद्धा धोका असतो. पालक व केल या दोन भाज्या जर आपण कच्च्या खाल्लं तर यामुळे किडनी स्टोनचा धोका वाढू शकतो. यात भर घालत त्यांनी नमूद केले की, या दोन्ही भाज्या कच्च्या खाल्लयास किडनी स्टोन, आयबीएस, गाउट, पोटफुगी आणि गॅसचा धोका वाढू शकतो. ज्यांना आधीच सांधेदुखी, सूज आणि जळजळ आहे, त्यांच्यासाठी पालकाचे जास्त सेवन करणे त्रासदायक ठरू शकते.

केल म्हणजे 'पालक' या पालेभाजीसारखी दिसणारी एक हिरवीगार भाजी आहे. तिला 'केले' (kale) म्हणूनही ओळखले जाते. ही भाजी खूप पौष्टिक असून त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के भरपूर प्रमाणात असतात. अनेकदा सुपरफूड्स म्हणून लेबल केलेले केल आणि पालक या भाज्या विविध रंग, आकारामध्ये येतात. अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध, या भाज्या हृदयरोग आणि कर्करोगापासून संरक्षण करतात असे दिसून आले आहे आणि फायबर, व्हिटॅमिन सी आणि कॅल्शियमने भरलेल्या आहेत.

# उन्हाळ्यात स्वयंपाक करताना किचनमध्ये उभं राहवत नाहीये?

किडनीचे म्हणजेच मूत्रपिंडाचे वेगवेगळे आजार होण्याचे प्रमाण आता वाढले आहे. हृदयरोगाप्रमाणेच कमी वयातच किडन्यांचे आजारही वाढत आहेत. किडनी हा शरीरातील एक लहानसा अवयव होय; पण तो आपल्या शरीर आणि आरोग्यासाठी खूप महत्त्वाचा असतो. किडनी निकामी होण्याची समस्या गेल्या काही वर्षांत अधिक दिसून येत आहे. किडनीचा आजार जितका धोकादायक आहे, तितकाच हा आजार उशिरा ओळखला जातो, त्यामुळे किडनीची थोडीशी समस्यादेखील किडनी पूर्णपणे खराब होण्याचे कारण बनते. भारतात किडनीचे आजार असलेल्या रुग्णांची संख्या झपाट्यानं वाढत आहे. चुकीच्या आहाराच्या सवयींमुळे किडनीच्या आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. पोषणतज्ज्ञ आणि आरोग्य प्रशिक्षक करिश्मा शाह यांनी किडनी स्टोनचा त्रास वाढण्यासाठी दोन भाज्या मुख्य कारण ठरू शकतात, याविषयी माहिती दिली आहे, त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ

करिश्मा शाह सांगतात, शरीरामध्ये खनिजे आणि क्षार पदार्थ यांची मात्रा वाढल्यास शरीरामध्ये किडनी स्टोन तयार होऊ लागतो. किडनी स्टोन ही एक फार असह्य वेदना देणारी आणि कुणालाही होणारी समस्या आहे. किडनीमध्ये स्टोन कॅल्शिअम ऑक्सालेटमुळे तयार होतात. लघवीमध्ये जेव्हा कॅल्शिअम आणि ऑक्सालेट दोन्हींचं प्रमाण अधिक वाढतं, तेव्हा दोन्ही गोष्टी एकत्र जमा होतात आणि छोटे छोटे स्टोन तयार होतात. चुकीच्या खाण्या-पिण्याच्या सवयी आणि चुकीच्या लाइफस्टाईलमुळे किडनी स्टोनची समस्या होते. भरपूर पाणी पिण्यासोबतच तुम्हाला खाण्या-पिण्याकडेही नीट लक्ष दिले पाहिजे. दररोज खाल्ले जाणारे काही पदार्थ हे किडनी स्टोनचा त्रास वाढवू शकतात. एवढेच नव्हे तर तुम्ही या पदार्थांचे अतिप्रमाणात सेवन केले तर किडनी स्टोन होण्याचा धोका वाढतो. करिश्मा शाह यांच्या माहितीनुसार, किडनी स्टोनचा त्रास वाढण्यासाठी दोन भाज्या मुख्य कारण ठरू शकतात, त्यामुळे या भाज्या चुकूनही कच्च्या खाऊ नये; त्यामुळे कालांतराने किडनी पूर्ण निकामी होण्याचासुद्धा धोका असतो. पालक व केल या दोन भाज्या जर आपण कच्च्या खाल्लं तर यामुळे किडनी स्टोनचा धोका वाढू शकतो.

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८ **मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ **वेबसाइट:** www.truhomefinance.in

### भौतिक ताबा सूचना

जसे की, निम्नस्वाक्षरीदार हे हे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अँण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३(१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार/ सह-कर्जदार/तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.

कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा भौतिक ताबा घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे मालमत्तेशी व्यवहार करू नये अशी ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लि) कडून येथे नमूद केलेल्यारकमेसाठी व्याजासह शुल्क आकारला जाईल.कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१. श्री.धवल बाळकृष्ण सन्यासी (कर्जदार)**
**२. श्रीमती रीमा धवल सन्यासी (सह-कर्जदार)**
**सध्याचा पत्ता: फ्लॅट क्रमांक ८०२, ८वा मजला, हर्मोसा कासा, प्लॉट क्रमांक ८०२,कीर्तने बाग, मुंढवा, हवेली महाराष्ट्र भारत ४१११०३६**
**मालमत्तेचा पत्ता: सारथी स्वदेश,चौथा मजला,इमारत क्रमांक ए६,गट क्रमांक ३५९,फ्लॅट क्रमांक डी ४११,जांभूळ, मावळ ४१२१०६**

**थकबाकी रक्कम**

दिनांक ०९-०७-२०२५ रोजी कर्ज खाते क्रमांक SHLHPUNH0002100 च्या संदर्भात रु. १७,८३,७१६/- (फक्त सतरा लाख त्र्याऐंशी हजार सातशे सोळा रुपये)
उक्त नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, करारानुसार दराने पुढील व्याजासह.
मागणी सूचना दिनांक- ११/०७/२०२५, प्रत्यक्ष ताबा मिळाल्याची तारीख – ०८/०५/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

जांभूळ गाव, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे, गट क्रमांक ३५९ असलेल्या सुमारे २ हेक्टर ५६.९ रु. क्षेत्रफळाच्या जमिनीवर बांधलेल्या, "सारथ स्वदेश" नावाच्या प्रकल्पातील, इमारत क्रमांक आर्य डी , चौथ्या मजल्यावर असलेला, ३३.७६ चौ. मीटर क्षेत्रफळाचा फ्लॅट क्रमांक डी ४११. (यापुढे "सदर फ्लॅट" म्हणून उल्लेखित.) याची सीमा खालीलप्रमाणे आहे:पूर्वेकडे किंवा पूर्वेकडे:फ्लॅट क्र. D410, दक्षिणेकडे किंवा दक्षिणेकडे: बाजूची जागा पश्चिमेकडे किंवा पश्चिमेकडे: डक्ट/फ्लॅट क्र. D412, उत्तरेकडे किंवा उत्तरेकडे: पॅसेज/ फ्लॅट क्र. D408

ठिकाण - पुणे
दिनांक: ०८/०५/२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

## पुणे महानगरपालिका
### निविदा प्रक्रिया कक्ष
### निविदा जाहिरात-नविन कामे

पुणे महानगरपालिका | पुणे अद्वितीय & Unique

विक्री कालावधी दिनांक: –११/०५/२०२६ ते २०/०५/२०२६ वेळ:–दु:०२.०० पर्यंत जाहिरात क्र:05-DC-5-2026 दिनांक:०८/०५/२०२६
स्विकृती कालावधी दिनांक:–११/०५/२०२६ ते २०/०५/२०२६ वेळ:– दु:०२.०० पर्यंत टेंडर उघडणे दिनांक:२२/०५/२०२६ – दु:१२:०० वाजता.

| अ. क्र. | टेंडर क्र. | विभाग | कामाचे नाव | निविदा संच किंमत | टेंडर रक्कम | १%बयाना रक्कम | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तिचे नाव व दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/05 | विद्युत | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत मनपा भवन विद्युत कोठी फायर ऑफिस आरोग्य कोठी येथे विद्युत वायरिंग देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२३६०३ | ४२३६ | १२ महिने | श्रीमती मोनाली मोरे ९६८९९३१४८० |
| २ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/06 | विद्युत | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत विद्युत विषयक कामांसाठी कुशल व अकुशल कामगार पुरविणे. | ४१५ | ९९९३८९ | ९९९४ | ९ महिने | श्रीमती मोनाली मोरे ९६८९९३१४८० |
| ३ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/07 | पथ | प्रभाग क्र.२५ मध्ये सदाशिव पेठ नारायण पेठ शनिवार पेठ बुधवार पेठ शुक्रवार पेठ मध्ये कॉंक्रीटीकरण करणे व इतर दुरुस्ती कामे करणे. | ४१५ | ६६३५७३ | ६६३६ | १२ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| ४ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/08 | पथ | प्रभाग क्र.२५ मध्ये सदाशिव पेठ नारायण पेठ शनिवार पेठ बुधवार पेठ शुक्रवार पेठ येथील राडारोडा उचलणे. | ४१५ | ८९९८७८ | ८९९९ | १२ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| ५ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/09 | पथ | प्रभाग क्र.२५ मध्ये सदाशिव पेठ नारायण पेठ शनिवार पेठ बुधवार पेठ शुक्रवार पेठ पावसाळी जाळ्या पुरविणे बसविणे दुरुस्ती करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ३३८९१३ | ३३८९ | १२ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| ६ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/10 | पथ | प्रभाग क्र.२५ मध्ये विविध ठिकाणी साईन बोर्ड रंगविणे रंगरंगोटी रेलिंगची कामे करणे व डिव्हायडरची कामे करणे. | ४१५ | ५५०८२९ | ५५०८ | १२ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| ७ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/11 | पथ | प्रभाग क्र.२७ मधील पावसाळी जाळी पुरविणे बसविणे व दुरुस्ती करणे. | ४१५ | ३३८९१४ | ३३८९ | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| ८ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/12 | पथ | प्रभाग क्र.२७ मध्ये साईन बोर्ड रंगविणे रेलिंगची कामे व डिव्हायडरची कामे करणे. | ४१५ | ५५०८०४ | ५५०८ | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| ९ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/13 | पथ | प्रभाग क्र.२७ मध्ये पथांवरील राडारोडा उचलणे व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८९९९६६ | ९००० | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| १० | PMC/DMC-5/VISHRAM/2026/14 | पथ | प्रभाग क्र.२७ मध्ये कॉंक्रीटीकरण फरशी व पेव्हिंग ब्लॉकची देखभाल दुरुस्ती करणे. | ४१५ | ६७७९५५ | ६७८० | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| ११ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/15 | ड्रेनेज | प्रभाग क्र.२७ मधील जुन्या ड्रेनेज लाईन बदलणे व दुरुस्ती करणे. | ४१५ | ६७७९२८ | ६७७९ | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| १२ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/16 | ड्रेनेज | प्रभाग क्र.२७ मध्ये ड्रेनेज लाईन व चेंबर साफसफाई करणे. | ४१५ | ६७७९३७ | ६७७९ | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| १३ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/17 | गवनि | प्रभाग क्र.२७ मधील सार्वजनिक / सुलभ शौचालय दुरुस्ती व मुताऱ्या दुरुस्ती करणे. | ४१५ | ८४७४०२ | ८४७४ | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| १४ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/18 | गवनि | प्रभाग क्र.२७ मध्ये स्वच्छ सर्वेक्षण संबंधित कामे करणे. | ४१५ | ५०८३७४ | ५०८४ | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| १५ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/19 | ड्रेनेज | प्रभाग क्र.२५ मध्ये सदाशिव पेठ नारायण पेठ शनिवार पेठ बुधवार पेठ शुक्रवार पेठ येथील जुन्या ड्रेनेज लाईन बदलणे दुरुस्ती करणे व इतर कामे करणे. | ४१५ | ६७७८४७ | ६७७८ | १२ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| १६ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/20 | ड्रेनेज | प्रभाग क्र.२५ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन चेंबर साफसफाई करणे व गाळ काढणे. | ४१५ | ६७७९१८ | ६७७९ | १२ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| १७ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/21 | भवन | विश्रामबागबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत वृक्ष छाटणी व संवर्धन विषयक कामे करणे करिता कंत्राटी पद्धतीने कुशल अकुशल मजूर पुरविणे. | ४१५ | ९९८९९२ | ९९९० | १२ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| १८ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/22 | पथ | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२६ मध्ये कॉंक्रीटीकरण फरशी व पेव्हिंग ब्लॉकची देखभाल दुरुस्ती करणे. | ४१५ | ४२३७०७ | ४२३७ | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| १९ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/23 | पथ | प्रभाग क्र.२६ मधील विविध ठिकाणचा राडारोडा उचलणे. | ४१५ | ५९९९७० | ६००० | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| २० | PMC/DMC-5/VISHRAM/2026/24 | पथ | प्रभाग क्र.२६ मध्ये प्रभागात विविध ठिकाणी खड्डे दुरुस्ती करणे. | ४१५ | ५५९२४५ | ५५९२ | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| २१ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/25 | पथ | प्रभाग क्र.२६ मध्ये विविध ठिकाणी साईन बोर्ड रेलिंग डिव्हायडर बसविणे व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ५५०७६४ | ५५०८ | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| २२ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/26 | गवनि | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२६ मध्ये स्वच्छ सर्वेक्षण संबंधित व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | २९६५६३ | २९६६ | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| २३ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/27 | गवनि | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२६ मध्ये सार्वजनिक / सुलभ शौचालय व मुताऱ्या दुरुस्ती करणे. | ४१५ | ६७७८७९ | ६७७९ | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| २४ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/28 | भवन | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२६ मधील मनपा इमारती दुरुस्ती करणे. | ४१५ | ५०८४१७ | ५०८४ | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| २५ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/29 | ड्रेनेज | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२६ मध्ये गवनि भागातील ड्रेनेज लाईन व चेंबर साफसफाई करणे. | ४१५ | ४२३६९६ | ४२३७ | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| २६ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/30 | ड्रेनेज | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२६ मधील जुन्या ड्रेनेज लाईन बदलणे व दुरुस्ती करणे. | ४१५ | ४२३७०७ | ४२३७ | ११ महिने | श्री विश्वजीत कारखानीस ९७६४४९०९८० |
| २७ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/31 | पथ | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत खड्डे दुरुस्ती साठी मजूर पुरविणे व त्यांचे कडून काम करून घेणे. | ४१५ | ९४९४४१ | ९४९४ | १२ महिने | श्रीमती कविता देशपांडे ९६८९९३१६८४ |
| २८ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/32 | ड्रेनेज | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत ड्रेनेजची किरकोळ दुरुस्तीची कामे मजुरांमार्फत करून घेणे. | ४१५ | ८४७३९७ | ८४७४ | १२ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| २९ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/33 | भवन | प्रभाग क्र.२७ मधील शाळा दवाखाने म.न.पा. इमारती दुरुस्ती करणे. | ४१५ | ७२०३१६ | ७२०३ | ११ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| ३० | PMC/DMC-5/VISHRAM/2026/34 | भवन | प्रभाग क्र.२७ मधील आरोग्य कोठ्या दुरुस्त करणे. | ४१५ | १७७९६२ | १७८० | ११ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| ३१ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/35 | भवन | प्रभाग क्र.२७ मधील स्मशानभूमी विसर्जन हौद ई. दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ६७७८६० | ६७७९ | ११ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |
| ३२ | PMC/DMC-5/VISHRAM/2026/36 | भवन | प्रभाग क्र.२७ मधील पथावरील पुतळ्यांची दुरुस्ती करणे. | ४१५ | २९६६०२ | २९६६ | ११ महिने | श्री निखिल साबळे ९६८९९३६९७५ |

१) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही भारतातील कोणत्या ही शासकीय / निम शासकीय यंत्रणा क पुर्व नोंदणीचे वैध प्रमाण पत्र असलेल्या ठेकेदारांकडुन (प्रत्येक कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत आणि निविदेसोबत जोडलेल्या अटी शर्ती वर ठेकेदाराने स्वाक्षरी करुन अ पाकिटात अपलोड करावयाचे आहे.
२) सदर कामांबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.
३ ) ऑनलाईन निविदा प्रक्रिये संबंधी संपुर्ण माहितीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा Contact No.0120-4200462 / 0120-4001002 / 91-8826246593.
४) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
५) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि.)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्क म ई.सी.एस/आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहेत.

**स्वाक्षरी**
**उप आयुक्त**
**परिमंडळ विभाग क्र. ५**
**पुणे महानगरपालिका, पुणे**

# कलाविश्व

## क्रिती सेनॉनचा बॉलीवूडबद्दल मोठा खुलासा



बॉलीवूडची लोकप्रिय व स्टायलिश अभिनेत्री क्रिती सेनॉन हिने अभिनयाच्या जोरावर सिनेविश्वामध्ये स्वतंत्र ओळख निर्माण केली. बॉलीवूडची कोणतीही पार्श्वभूमी नसताना क्रितीने कलेमध्ये सातत्य दाखवीत एक दशक प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. हिरोपंती या चित्रपटातून टायगर श्रॉफसह बॉलीवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या क्रितीला २०२३ मध्ये राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये क्रिती सेनॉन हिने राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतरच्या भावना आणि बॉलीवूडमध्ये आजही असलेले घराणेशाही यांवर परखड भाष्य केले.

राष्ट्रीय पुरस्कार' हा सर्वात गौरवशाली क्षण – क्रिती

अभिनेत्री क्रिती सेनॉन हिला मीमी या चित्रपटासाठी २०२३ साली सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. एका मुलाखतीत हा क्षण क्रितीसाठी अत्यंत अभिमानाचा आणि करिअरमधील सर्वांत सुखद अनुभव देणारा असल्याचे तिने सांगितले. क्रिती सेनॉन म्हणाली की, माझ्या करिअरमधील सर्वांत महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे मीमी' आणि त्याला मिळालेले अमाप प्रेम. कारण– हा असा पहिलाच प्रकल्प होता, ज्याची संपूर्ण जबाबदारी मी माझ्या खांद्यावर घेतली होती. आम्ही कोरोना महामारीच्या अत्यंत अनिश्चित काळातून जात होतो. चित्रपट मुळात चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार होता; परंतु त्याऐवजी तो ओटीटीवर प्रदर्शित झाला. मात्र, चित्रपटाला प्रेक्षकांनी प्रचंड प्रेम दिले आणि प्रमुख भूमिकेसाठी मला राष्ट्रीय पुरस्कार' मिळाला. हा माझ्या कारकिर्दीतील सर्वांत गौरवशाली क्षणांपैकी एक ठरला, अशा भावना क्रिती सेनॉन हिने व्यक्त केल्या.

स्टार किड्सना संधी मिळाल्याची खंत

क्रिती सेनॉन हिचे बॉलीवूडशी संबंध नव्हते. ती बाहेरून आल्यामुळे करिअरच्या सुरुवातीच्या काळात अनेक समस्यांना तोंड दिले. आजही बॉलीवूडमध्ये नेपोटिझमचे वर्चस्व असून, त्यामुळे माझ्या अनेक संधी वाया गेल्या असल्याची खंत क्रितीने व्यक्त केली. क्रिती सेनॉन म्हणाली, मीमी चित्रपटापूर्वी मला खूप मनस्ताप झाला. कारण– मला माहीत होते की, माझ्यामध्ये काहीतरी जास्त करण्याची क्षमता आहे; पण मला संधी कमी मिळत होत्या. अशा अनेक भूमिका होत्या, जिथे माझी बोलणी अगदी शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहचली होती; पण त्या संधी स्टार किड्सना मिळाल्या. मात्र, ही गोष्ट माझ्या कंट्रोलमध्ये नव्हती. जेव्हा तुमची चित्रपटसृष्टीची पार्श्वभूमी नसते, तेव्हा तुम्हाला मोठ्या प्रमाणातील अनिश्चिततेचा सामना करावा लागतो, अशी कबुली क्रिती सेनॉन हिने दिली आहे

## १३२ मिलियन व्ह्यूज असणारं ते' रोमँटिक गाणं १२ वर्षांपासून सर्वांना लावलंय वेड



२०१० च्या सुरुवातीच्या काळात हिंदी चित्रपटांतील रोमँटिक गाण्यांची एक वेगळीच क्रेझ होती. त्याच काळात एक असं गाणं आलं, ज्याने प्रेमाची भावना अत्यंत सुंदर पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचवली. या गाण्याचं संगीत ऐकताच मनाला सुकुन मिळायचा आणि तरुणांमध्ये हे गाणं वेगाने व्हायरल झालं. गाण्याचं संगीत आधुनिक होतं, पण त्यात जुन्या काळातील रोमान्सचा निरागसपणाही जाणवत होता. यामुळेच आजही लोक हे गाणं तितक्याच आवडीने ऐकतात. आज हे गाणं केवळ एक फिल्मी ट्रॅक उरलं नसून, लोकांचं सर्वात आवडतं 'लव्ह साँग' बनलं आहे. त्या काळात लोकांना अशी गाणी ऐकायला जास्त आवडायचं, ज्यामध्ये केवळ शानदार संगीतच नाही तर रोमँटिक भावनाही जाणवतील. त्यामुळेच त्या काळातील नवीन रोमँटिक गाण्यांनी लोकांच्या मनात खास जागा निर्माण केली होती. आज आम्ही तुम्हाला अशाच एका गाण्याबद्दल सांगणार आहोत, ज्यामध्ये प्रेमाचा गोडवा आणि हलकी बेचैनी दोन्ही होती, जी थेट ऐकणाऱ्याच्या हृदयाला भिडायची. रेडिओ, मोबाईल प्ले–लिस्ट आणि कॉलेज कॅम्पसमध्ये हे गाणं सर्वत्र ऐकू यायचं. विशेष म्हणजे, आजही लाखो लोकांचं हे सर्वात आवडतं गाणं असेल.

त्या काळात या गाण्याची एक वेगळीच जादू होती आणि अनेकांनी हे गाणं आपल्या लव्ह स्टोरीशी जोडून घेतलं होतं. आजही हे गाणं ऐकताच लोक जुन्या आठवणीत आणि आपल्या खास क्षणांत हरवून जातात. विशेष बाब म्हणजे, हे गाणं आधी साऊथ व्हर्जनमध्ये आलं होतं, त्यानंतर त्याचं हिंदी व्हर्जन आलं आणि ते रातोरात सुपरहिट झालं. या गाण्याला लिओन डी'सूजा आणि सुझैन डी'मेलो यांनी आपला सुमधुर आवाज दिला होता. गाण्याचं संगीत दिग्गज ए. आर. रहमान यांनी संगीतबद्ध केलं होतं, तर गाण्याचे हिंदी शब्द जावेद अख्तर यांनी लिहिले होते. या सुपरहिट गाण्याचं नाव होसाना' असं आहे, जे २०१२ मध्ये आलेल्या एक दिवाना था' या चित्रपटात होतं. या गाण्याचं संगीत आणि शब्दांचा मेळ इतका अप्रतिम होता की लोकांनी त्याला लगेच पसंती दिली. हे गाणं प्रतीक बब्बर आणि एमी जॅक्सन यांच्यावर चित्रित करण्यात आलं होतं. गाण्यात प्रेमाच्या सुरुवातीचा काळ अतिशय गोड अंदाजात दाखवला होता. गाण्याचं लोकेशन, कॅमेरा वर्क आणि कलाकारांचे नैसर्गिक हावभाव प्रेक्षकांना खूप आवडले. प्रदर्शित होताच हे गाणं म्युझिक चार्ट्सवर राज्य करू लागलं होतं. या गाण्याच्या सॉफ्ट मेलोडीने लोकांना वेड लावलं. आजही हिंदी सिनेमातील सर्वात सुंदर रोमँटिक गाण्यांमध्ये याची गणना केली जाते. युट्यूबवर या गाण्याला १३२ मिलियन (१३.२ कोटी) हून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. काळाप्रमाणे संगीताचा ट्रेंड बदलला, पण होसाना'ची लोकप्रियता आजही कायम आहे. सोशल मीडिया रील्स, लाईव्ह कॉन्सर्ट आणि कव्हर साँग्समध्ये हे गाणं सातत्याने ऐकू येतं. नवीन पिढीलाही हे गाणं तितकंच आवडतं, जितकं पूर्वी आवडायचं. याची धून आणि शब्द आजही काळजाला स्पर्श करतात.

# भोंदू अशोक खरात प्रकरणात रोहित पवारांचा मोठा गौप्यस्फोट

## फक्त १ टक्के सत्य बाहेर आले; अनेक मोठे मासे अजूनही पडद्यामागे



**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : भोंदू अशोक खरात प्रकरण संपूर्ण महाराष्ट्रात गाजले आहे. या प्रकरणात अजूनही नवनवे खुलासे होत आहेत. अशोक खरातने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे समोर आले आहे. तसेच त्याने भोंदुगिरी करून कोट्यवधी रुपयांची संपत्ती जमवली आहे. त्याचबरोबर त्याने काही आर्थिक घोटाळेही केल्याचे समोर आले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे अशोक खरातचे काही राजकीय नेत्यांसोबत संबंध असल्याचेही समोर आलेले आहे. तसेच इतरही नामांकित व्यक्ती खरातच्या संपर्कात होते हेही समोर आलेले आहे. अशातच आता राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणात आतापर्यंतचा सर्वात मोठा गौप्यस्फोट केला आहे. यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. रोहित पवार यांनी काय म्हटलं ते जाणून घेऊयात.

राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी भोंदू खरात प्रकरणात आतापर्यंतचा सर्वात मोठा गौप्यस्फोट केला आहे. रोहित पवार यांनी म्हटले की, भोंदू खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी, व्यावसायिक अडकले असून त्या प्रकरणातील १% सत्य देखील समोर आलेले नाही. समोर जे काही आले आहे ते केवळ छोटे मासे आहेत. यामध्ये अनेक मोठे मासे देखील असून महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय म्हणून हे प्रकरण नोंद होणार आहे.'

भोंदू खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी, व्यावसायिक अडकले असून त्या प्रकरणातील १% सत्य देखील समोर आलेले नाही. समोर जे काही आले आहे ते केवळ छोटे मासे आहेत .

यामध्ये अनेक मोठे मासे देखील असून महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय म्हणून हे प्रकरण नोंद होणार आहे

पुढे रोहित पवार यांनी म्हटले की, या प्रकरणाच्या तपासातून सुटका करून घेण्यासाठी किंवा नाव बाजूला काढण्यासाठी एक मोठे आर्थिक रॅकेट काम करत असल्याची माहिती समजत आहे. मोठमोठ्या रकमा घेऊन अनेकांना यातून अलगद बाहेर काढले जात आहे. ज्यांना या प्रकरणातून बाहेर काढायचे आहे त्यांना भोंदू विरोधात फसवणूक केल्याची तक्रार करायला सांगितले जाते आणि या प्रकरणातून बाहेर काढले जाते अशी ही पद्धती असल्याची माहिती आहे. या माहितीची शहानिशा करून गृहमंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करावी, ही विनंती.'

# भोंदू खरात प्रकरणी रूपाली चाकणकर यांची चौकशी सुरू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

नाशिक : भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे वादात अडकलेल्या रूपाली चाकणकर यांची नाशिक एसआयटीसमोर चौकशी सुरू झाली आहे. आज सकाळी चाकणकर यांनी पुण्याहून नाशिकला जात तपास यंत्रणेसमोर हजेरी लावली. रूपाली चाकणकर या वकिलांसोबत चौकशीसाठी पोहचल्या. महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून चाकणकर यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केला होता असा आरोप आहे. त्याशिवाय खरात यांच्या शिवानिका संस्थाच्या विश्वस्तपदी रूपाली चाकणकर होत्या. त्यामुळे आर्थिक व्यवहारांबाबतही चाकणकर यांची चौकशी करण्यात येत आहे. एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते या रूपाली चाकणकर यांची चौकशी करत आहेत. खरातशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि त्यांच्यावर झालेल्या आरोपाबाबत ही चौकशी होत आहे. या चौकशीला हजर होण्यापूर्वी चाकणकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या की, आज जो एसआयटीचा तपास सुरू आहे, त्यांना काही प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. ती देण्यासाठी मी आली आहे. तपासात माझे पूर्णपणे सहकार्य राहील. तपास यंत्रणेला जी काही मदत लागेल ती निश्चितपणे केली जाईल असं त्यांनी म्हटलं आहे.

तर खरात प्रकरणात राज्याच्या मंत्रिमंडळातील ४ मंत्र्यांचा समावेश आहे. या मंत्र्यांची हकालपट्टी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवणार असून भोंदू खरातकडून सगळी माहिती गोळा करून त्याचा एन्काऊंटर केला जाईल असा दावा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे.

# जोसेफ विजय तमिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान!



**जनप्रवास । वृत्तसंस्था**

तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आलेल्या टीव्हीकेचे प्रमुख जोसेफ विजय यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. तमिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्याकडे आपले बहुमत सिद्ध करताना अडथळ्यांचा सामना केल्यानंतर अखेर विजय यांचा शपथविधी आज (रविवार) पार पडला. हा कार्यक्रम चेन्नईच्या जवाहरलाल स्टेडियमवर पार पडला.

दरम्यान राज्यपाल आर्लेकर यांनी जोसेफ विजय यांना १३ मे किंवा त्यापूर्वी विधानसभेत विश्वासदर्शक ठराव मांडण्यास सांगितले आहे.

विजय यांच्या टीव्हीके पक्षाने तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळला. याबरोबरच टीव्हीकेने द्रविड मुनेत्र कळघम (डीएमके) आणि ऑल इंडिया अण्णा मुन्नेत्र कळघम या पक्षांचे ५० वर्षांचे वर्चस्व मोडीत काढले आहे. ५१ वर्षीय विजय यांनी या दोन्ही पक्षांना निवडणुकीत मोठ्या फरकाने मागे टाकले . विजय आता एम.के. स्टॅलिन यांच्यानंतर तमिळनाडूचे नवे मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाले आहेत.

व्हीसीके आणि इंडियन युनियन मुस्लिम लीगने शनिवारी टीव्हीकेला दिलेल्या पाठिंब्यामुळे विजय यांना आवश्यक असलेले बहुमत गाठता आले.

काँग्रेस, सीपीआय आणि सीपीआय (एम) यांनी आधीच टीव्हीकेला पाठिंबा दिला होता, ज्यामुळे शुक्रवारी रात्रीपर्यंत त्यांचे संख्याबळ १०७ वरून ११६ वर पोहोचले. त्यानंतर व्हीसीके आणि आययूएमएल हे पक्षदेखील सोबत आल्याने हा आकडा १२० वर गेला.

विजय यांच्याबरोबर मंत्रिमंडळातील नऊ सदस्यांनीही शपथ घेतली. एम. जी. रामचंद्रन यांच्या काळापासून तमिळनाडूच्या मंत्रिमंडळात परिचित चेहरा असलेले के. ए. सेंगोट्टायन यांचा अपवाद वगळता, इतर सर्वजण पहिल्यांदाच मंत्री म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत.

# कोकण, गोवा प्रवाशांना रेल्वेचा सुखद दिलासा; साप्ताहिक उन्हाळी विशेष रेल्वे



**जनप्रवास । प्रतिनिधी**

नवी मुंबई : उन्हाळी सुट्ट्यांमध्ये कोकण आणि गोव्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने प्रवाशांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मडगाव जंक्शन–पनवेल–मडगाव जंक्शन दरम्यान अतिरिक्त साप्ताहिक उन्हाळी विशेष रेल्वे चालवण्याची घोषणा केली आहे.


रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०११०६ मडगाव जंक्शन–पनवेल रेल्वे स्थानक साप्ताहिक विशेष रेल्वे रविवार, १० मे २०२६ रोजी सायंकाळी ४:३० वाजता मडगाव जंक्शन येथून रवाना होणार आहे. ती दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता पनवेल स्थानकात पोहोचेल.

त्यानंतर गाडी क्रमांक ०११०५ पनवेल–मडगाव जंक्शन विशेष रेल्वे सोमवार, ११ मे २०२६ रोजी सकाळी ५:४५ वाजता पनवेल येथून सुटणार असून, सायंकाळी ६:१० वाजता मडगाव जंक्शन येथे पोहोचणार आहे.

कोकणातील महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा

ही विशेष रेल्वे करमाळी, थिवीम, सावंतवाडी रोड, कुडाळ, सिंधुदुर्ग, कणकवली, वैभववाडी रोड, राजापूर रोड, विलवडे, आडावली, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, चिपळूण, खेड, माणगाव, रोहा आणि पेण या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा घेणार आहे. त्यामुळे गोवा, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील प्रवाशांना या सेवेचा मोठा लाभ होईल.

# महिला व बाल विकास विभागातील बदल्या आता ऑनलाइन



**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : राज्यात घडत असलेल्या बाल अत्याचार प्रकरणानंतर महिला आणि बाल विकास विभागाने प्रत्येक जिल्ह्यात अधिकारी उपलब्ध व्हावेत यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. काय आहे हा निर्णय!

महिला व बाल विकास विभागातील सर्व पदांच्या बदल्या आता केंद्रित ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास विभागाने दिली आहे.

या निर्णयामुळे बदली प्रक्रियेत पारदर्शकता वाढणार असून कर्मचाऱ्यांना अधिक सुलभ आणि न्याय्य पद्धतीने बदलीची संधी उपलब्ध होणार आहे.

विभागातील बदल्या डिजिटल प्रणालीद्वारे केल्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन संपूर्ण प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार आहेत. तसेच, बदली प्रक्रियेत गुणवत्ता, सेवाज्येष्ठता, प्राधान्यक्रम आणि नियमांचा वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार केला जाणार आहे.

# मराठमोळ्या गायकांचा सुरेल नजराणा ; बोरीवली येथे बहारदार संगीत मैफल



**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : श्री स्वामी समर्थ संगीत परिवारातर्फे नुकताच वझीरा नाका – बोरिवली (पश्चिम) परिसरातील रेलनगर वेलफेअर असोसिएशन ट्रस्टच्या सभागृहामध्ये सुमधुर अशा मराठी सुगम संगीताचा एक सुश्राव्य कार्यक्रम सादर करण्यात आला. श्री. विनय सबनीस यांच्या मार्गदर्शनाखाली नारायण बांदेकर, सुनील भालेराव, गिरीधर घाटे, प्रदीप आंगणे, वीरेंद्र वर्तक, चंद्रशेखर साळुंखे, मंदाकिनी गांगुर्डे, मंजिरी सहस्रबुद्धे, प्राजक्ता आजगांवकर, कविता पै, रश्मी मुळे, सुप्रिया सबनीस या गायका गायिकांनी अतीशय परिश्रमपूर्वक हा कार्यक्रम एका चांगल्या उंचीवर नेला. संगीतप्रेमी रसिक श्रोते आसनाला खिळून होते, गाण्यांना उत्स्फूर्तपणे दाद देत होते. निवेदन पूजा करगुटकर यांनी केले. सुरेल सादरीकरण, कलाकारांची ऊर्जा आणि श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद , सगळयाच गोष्टींनी कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. मराठी पाऊल पडते पुढे, शूर आम्ही सरदार आम्हाला, संथ वाहते कृष्णामाई, हे नृसिंह प्रभो शिवाजी राजा, आई भवानी तुझ्या कृपेने, म्यानातून उसळे तलवारीची पात, सागरा प्राण तळमळला, अखेरचा हा तुला दंडवत या सारखी रसिकांची आवडती गाणी सादर झाली.

शिवचरित्राचे गाढे अभ्यासक, शिवभक्त व ५०७ वेळा रायगड सर करणारे सर्जा व सर्वद फाउंडेशन तर्फे दिला जाणारा सर्वद स्टार, गड किल्ले संवर्धन, इतिहास संशोधन पुरस्कार विजेते राजू देसाई तसेच ज्येष्ठ साहित्यिक रवि मल्लया, रेलनगर वेलफेअर असोसिएशन ट्रस्टचे सचिव प्रफुल्ल रेडकर व खजिनदार मोहन माने आदी मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

# समाजकल्याण खात्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे : मंत्री संजय शिरसाट



**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : सामाजिक न्याय विभागाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन दिवसेंदिवस बदलत आहे, आगामी काळातही कामात सातत्य ठेवून समाजकल्याण खात्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी आणखीन चांगले काम करावे; 'सामाजिक न्याय' संकल्पना डोळ्यासमोर ठेवून समाजातील शेवटच्या घटकांना न्याय देण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे, असे आवाहन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेच्यवतीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लोणावळा येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विभागाचे सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, आयुक्त दिपा मुधोळ–मुंडे, सामाजिक न्याय खात्यातील सहसचिव सो.ना. बागुल, उपसचिव वर्षा देशमुख, अवर सचिव सतीश खैरमोडे, राज्यातील प्रादेशिक उपायुक्त, सहायक उपायुक्त उपस्थित होते.

शिरसाट म्हणाले, विभागाच्यावतीने विद्यार्थी घडविण्याचे फार मोठे काम करण्यात येते. विद्यार्थीच्या जीवनात आमूलाग्र बदल घडविण्यासाठी वसतिगृहाचे अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे राज्यात वसतिगृह उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये देण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये बदल करुन त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करण्यात यावा. विभागामध्ये चांगले काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यात यावे. त्यांनीही विभागात आपल्या कामाच्या माध्यमातून वेगळी छाप निर्माण करावी, राज्याला दिशादर्शक होईल यादृष्टीने नवनवीन उपक्रम राबवावेत, या उपक्रमाचे इतरांनी अनुकरण करण्याची गरज आहे. अधिकारी–कर्मचाऱ्यांकरिता कार्यालयाच्याजवळ निवासस्थान उपलब्ध करण्यासोबतच सोसायटी स्थापन करण्याबाबत नियोजन करावे. कार्यशाळा ही अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या विचारांची देवाण–घेवाण तसेच त्यांच्या अडीअडचणी मांडण्याची व्यासपीठ आहे, त्यामुळे या कार्यशाळेचा आनंद घेत विचाराची देवाण–घेवाण करावी. याठिकाणी झालेले निर्णय, चर्चेच्या अनुषंगाने विभागात प्रभावीपणे अंमलबजावणी करून आगामी सकारात्मक परिणाम दिसले पाहिजे. राज्याच्या अर्थसंकल्पात विभागासाठी मंजूर झालेला निधी वेळेत खर्च होईल, यादृष्टीने काम करावे, असेही शिरसाट म्हणाले.

प्रधान सचिव डॉ. कांबळे म्हणाले, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. विभागाच्यवतीने समाजातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, नागरिक आदी घटकांसाठी लोक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन त्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी काम करावे. येत्या काळात शिक्षण, पायाभूत सुविधा, उद्योजकता, सामजिक सुरक्षा आणि तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर या पाच पैलूंवर काम करुन विभागाची धोरण ठरविण्यात येणार आहे, त्यामुळे विभागाने विकसित महाराष्ट्र २०२७ चा दृष्टिकोन समोर ठेवून प्रभावीपणे काम करावे, असेही डॉ. कांबळे म्हणाले.

□ मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ संपादक –सिध्दार्थ संजय भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे–४११ ००४ येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com